# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३ रा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १६ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## इस्रोची यशस्वी कामगिरी, भारतानं पुन्हा रचला इतिहास अमेरिका, चीन, रशियानंतर...भारताचं नाव जोडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**

इस्रोने आज भारतीय अंतराळ जगतात आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकलं आहे. स्पॅडेक्स मिशन अंतर्गत स्पेस डॉकिंग तंत्रज्ञानाचा यशस्वी प्रयोग करण्यात आला आहे. या प्रयोगाद्वारे दोन भारतीय उपग्रहांमधील यशस्वी डॉकिंग घडून आले असून हा प्रकार भारताच्या अंतराळ क्षेत्रातील संशोधन आणि विकासाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा मानला जात आहे.

स्पॅडेक्स मिशन अंतर्गत, हे तंत्रज्ञान अंतराळात दोन अवकाश यानांना एकमेकांशी जोडण्याचे कार्य करते. यामुळे भविष्यातील मनुष्यबळ असलेल्या अंतराळ मोहिमा, अंतराळातील देखभाल, तसेच यानांच्या इंधन भरावासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) सध्या या क्षेत्रात आघाडीवर असून भविष्यातील अवकाश मोहिमांसाठी हा प्रयोग महत्त्वपूर्ण मानला जात आहे. इस्रोच्या या यशाबद्दल देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून पंतप्रधानांनी इस्रोच्या वैज्ञानिकांचे कौतुक केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, उपग्रहांच्या स्पेस डॉकिंगच्या यशस्वी प्रयोगाबद्दल इस्रो च्या वैज्ञानिकांचे आणि संपूर्ण अंतराळ क्षेत्रातील सहकाऱ्यांचे



अभिनंदन, भारताच्या आगामी महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहिमांसाठी हे एक महत्त्वाचे पाऊल आहे असं त्यांनी सांगितले.

या मोहिमेच्या यशावरच चंद्रयान-४, गगनयान आणि भारतीय अंतराळ स्थानक यासारख्या मोहिमा अवलंबून होत्या. चंद्रयान-४ मोहिमेत चंद्राच्या मातीचे नमुने पृथ्वीवर आणले जातील. गगनयान मोहिमेत मानवांना अंतराळात पाठवले जाईल. इस्रोने ३० डिसेंबर २०२४ रोजी रात्री १० वाजता श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून स्पेस डॉकिंग एक्सपेरिमेंट मिशन लाँच केले होते या अंतर्गत, PSLV-C60 रॉकेटद्वारे पृथ्वीपासून ४७० किमी वर दोन अंतराळयान तैनात करण्यात आले. या मोहिमेत दोन्ही अंतराळयान ७ जानेवारी रोजी जोडले जाणार होते, परंतु ते पुढे ढकलण्यात आले. त्यानंतर ९ जानेवारी रोजीही तांत्रिक अडचणींमुळे डॉकिंग पुढे ढकलण्यात आले. १२ जानेवारी रोजी अंतराळयानांना एकमेकांपासून ३ मीटर अंतरावर आणण्यात आले आणि नंतर सुरक्षित अंतरावर परत हलवण्यात आले.

दरम्यान, डॉकिंग तंत्रज्ञान भारताच्या अंतराळाच्या महत्वाकांक्षांसाठी आहे. चंद्रावर भारतीय मोहिम, चंद्रावरून नमुने परत आणणे, भारतीय अंतराळ स्थानक (BAS) तयार करणे आणि ते चालवणे, या सर्वांसाठी आवश्यक आहे. या मोहिमेमुळे भारत अंतराळ डॉकिंग तंत्रज्ञान असलेला जगातील चौथा देश बनला आहे. आतापर्यंत ही कामगिरी फक्त अमेरिका, चीन आणि रशिया यांनी पूर्ण केलीय. आता यादीत चौथ्या क्रमांकावर भारताचं नाव जोडले आहे.

## अरविंद केजरीवाल यांच्याकडे १.७३ कोटींची संपत्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नवी दिल्ली**

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनी बुधवारी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. केजरीवाल हे नवी दिल्ली मतदारसंघातून निवडणुकीच्या मैदाना उतरत आहेत. दरम्यान निवडणूक आयोगाकडे त्यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात आपली संपत्ती जाहीर केली आहे. या प्रतिज्ञापत्रानुसार अरविंद केजरीवाल यांच्याकडे १.७३ कोटींची संपत्ती असून त्यांच्याकडे स्वत:चं घर किंवा गाडी नसल्याचे समोर आलं आहे.



अरविंद केजरीवाल यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार त्याची जंगम मालमत्ता ३,४६ लाख रुपये आहे, ज्यात २.९६ लाख रुपये बँकेत बचत म्हणून ठेवलेले आहेत. तर ५० हजार रुपये रोख आहेत. गाझियाबादमधील फ्लॅटसह त्यांची स्थावर मालमत्ता १.७ कोटी रूपयांची आहे. तसेच केजरीवाल यांनी मुदत ठेवी, शेअर्स, म्युच्युअल फंड किंवा विमा पॉलिसींमध्ये कोणतीही गुंतवणूक केलेली नाही.अरविंद केजरीवाल यांच्या वार्षिक उत्पन्न देखील गेल्या काही वर्षांमध्ये कमी झाल्याचे आढळून आले आहे. २०२० साली त्यांनी जाहीर केलेल्या ४४.९० लाख रुपयांच्या उत्पन्नावरून आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये त्यांचे उत्पन्न ७.२१ लाख रुपये इतके खाली घसरले आहे.

## आता महाकुंभमेळ्यात दिसले ‘कांटे वाले बाबा’ ५० वर्षांपासून करतायत काट्यांवर तपश्चर्या!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६प्रयागराज**

प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभमेळयादरम्यान कोट्यवधी भाविक दाखल झाले आहेत. येथे श्रद्धेची वेगवेगळी रुप बघायला मिळत आहेत. अगदी स्प्लेंडर बाबापासून ते आयआयटीयन बाबापर्यंत पर्यंत, अनेक जण चर्चेत आहेत. यातच आता सोमोर आले आहेत 'काँटे वाले बाबा'. त्यांचा व्हिडिओ इंटरनेटवर जबरदस्त व्हायरल होत आहे. त्यांचे नाव रमेश कुमार मांझी असे आहे. त्यांच्या साधना करण्याच्या अनोख्या पद्धतीमुळे ते सध्या जबरदस्त चर्चेत आहेत. आकर्षणाचे केंद्र बनले आहेत.



हे बाबा काट्यांवरच साधना करतात, यामुळेच त्यांना 'कांटे वाले बाबा', म्हटले जाते. ते गेल्या ५० वर्षांपासून दरवर्षी अशी साधना करत आहेत. तसेच आपल्याला या काट्यांपासून कसलही इजा होत नाही, असेही सांगतात. यासंदर्भात विचारले असता ते म्हणाले, मी गुरुंची सेवा करतो. गुरुंनी आम्हाला ज्ञान दिले, आशीर्वाद दिले. हा सर्व देवाचा चमत्कार आहे. मी गेल्या ४०-५० वर्षांपासून दरवर्षी अशा पद्धतीने साधना करतो.

बाबांनी म्हटले आहे की, आपण उज्जैन, हरिद्वार, नाशिक आणि गंगासागरलाही भेट देतात. मला फायदा होतो म्हणून मी हे करतो. यामुळे मला कधीही त्रास होत नाही. पुढे ते म्हणाले, मी दिवसाला हजार रुपये कमवतो. मिळणाऱ्या दक्षिणेतील अर्धी रक्कम मी जन्माष्टमीला देईल आणि उरलेली माझ्या खर्चासाठी वापरेन.दरम्यान, १० देशांच्या २१ सदस्यांचे प्रतिनिधिमंडळ बुधवारी सायंकाळी प्रयागराजमधील अरेल टेंट सिटीमध्ये पोहोचले. यांत फिजी, फिनलंड, गयाना, मलेशिया, मॉरिशस, सिंगापूर, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, त्रिनिदाद आणि टोबॅगो आणि संयुक्त अरब अमिराती चे प्रतिनिधी आहेत. यांनी आज संगमावर स्नान केले. दौऱ्यादरम्यान हे प्रतिनिधिमंडळ प्रयागराजची समृद्ध सांस्कृती आणि ऐतिहासिक वारसा समजून घेण्यासाठी हेरिटेज वॉकमध्येही भाग घेईल. १३ जानेवारीपासून सुरू झालेला हा कुंभमेळा २६ फेब्रुवारीपर्यंत चालेल.

## इंदिरा गांधी माझ्यासाठी सर्वात मोठ्या व्हिलन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचं वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६मुंबई**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारताच्या दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याबाबत खळबळजनक वक्तव्य केलं आहे. इंदिरा गांधी माझ्यासाठी सर्वात मोठ्या व्हिलन होत्या, असं वक्तव्य फडणवीसांनी केलं आहे. फडणवीसांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. फडणवीसांनी नुकतंच कंगना राणौतच्या ‘इमर्जन्सी’ चित्रपटाच्या स्क्रीनिंगला हजेरी लावली. यावेळी त्यांनी कंगनाचं कौतुक करत



आणीबाणीवर भाष्य केलं आहे.

इमर्जन्सी चित्रपट आणि या चित्रपटाच्या टीमचं कौतुक करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आणीबाणी आपल्या सर्वांसाठी असा काळ होता, जेव्हा देशातील सगळ्या नागरिकांचे मानवाधिकार समाप्त करण्यात आले होते. हा काळ माझ्यासाठी वैयक्तिकरित्या महत्वाचा आहे. कारण आणीबाणीच्या काळात माझे वडील जवळपास दोन वर्षे तुरुंगात होते. तेव्हा मी केवळ पाच वर्षांचा होतो. त्यावेळी मला वडिलांना भेटायचं असेल तर न्यायालय किंवा तुरुंगात जावं लागायचं. आजही त्या आठवणी माझ्या मनात ताज्या आहेत.

आता तो आणीबाणीचा काळ पुन्हा एकदा कंगनाने चित्रपटाच्या माध्यमातून आपल्या समोर आणला आहे. कंगना स्वत: या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहे. ती प्रत्येक व्यक्तिरेखेला न्याय देते. ती एक उत्कृष्ण अभिनेत्री आहे. इंदिरा गांधी देशाच्या खूप मोठ्या नेत्या होत्या. पण त्या काळात त्या आमच्यासाठी खूप मोठ्या व्हिलन होत्या. पण ठीक आहे. प्रत्येक कालखंडाची एक वेगळी कहाणी असते. इंदिरा गांधी यांनीही आपल्या देशासाठी चांगलं काम केलं आहे, असंही फडणवीस म्हणाले.

मला वाटतं की, आणीबाणी आपल्या देशासाठी वाईट जखम होती. त्यामुळे ती देशातील लोकांपर्यंत पोहोचवणं पण तितकंच गरजेचं आहे. जर आपल्याला लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर लोकशाहीवर आलेल्या संकटाबाबत आपल्या येणाऱ्या पिढीला सांगावं लागेल. कारण तोपर्यंत त्यांना लोकशाहीची किंमत कळणार नाही, असंही फडणवीस म्हणाले.

## ऐन हिवाळ्यात निर्माण झाला वीज संकटाचा धोका; २५ हजार मेगावॅटपेक्षा अधिक मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नागपूर**

ऐन थंडीच्या काळात विजेची मागणी २५ हजार मेगावॅटच्या पुढे गेली आहे. यातच वीज केंद्रांची गतीही मंदावली आहे. महाजेनकोच्या औष्णिक वीज केंद्रातील तीन युनिट बंद आहेत, तर महाराष्ट्राला वीज पुरवणारे दोन गॅसवर आधारित प्रकल्प ठप्प आहेत. महाजेनकोलाही गॅसचा तुटवडा जाणवत आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात विजेचे



संकट ओढावण्याची शक्यता आहे. महावितरणनेही हे आव्हान स्वीकारत वाढीव मागणी पूर्ण करण्याचे नियोजना सुरू केले आहे. हिवाळ्यात महाराष्ट्रात विजेची सर्वाधिक २० हजार मेगावॅट असते. मात्र यंदा पावसाळ्यात चांगला पाऊस झाल्याने पुरेसा पाणीसाठा आहे. शेतकरी आतापर्यंत कृषिपंप वापरत आहेत. अशा स्थितीत विजेच्या मागणीने २५ हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला आहे. दुसरीकडे, महाजेनकोच्या चंद्रपूर औष्णिक वीज केंद्रातील युनिट ६ आणि ९ बंद आहेत. तसेच कोराडीतील युनिट क्रमांक ९ देखील तांत्रिक कारणामुळे बंद आहे. दुसरीकडे, एनटीपीसीची कवास आणि गंधार वीज केंद्रे गॅसच्या कमतरतेमुळे ठप्प आहेत.

**१६९० मेगावॅट पॉवर एक्स्चेंजमधून**


मागणी आणि पुरवठा यांच्यात समन्वय साधण्यात महावितरणला मोठी अडचण येत आहे. मंगळवारी त्यांना पॉवर एक्स्चेंजमधून १६९० मेगावॅट वीज घ्यावी लागली. तसेच खासगी क्षेत्रातून ५५४३ मेगावॅट, सौरऊर्जेतून २३१३ मेगावॅट आणि जलविद्युत क्षेत्रातून १४८३ मेगावॅट वीज मिळाली. यावर झालेला खर्च सर्वसामान्य ग्राहकांकडून इंधन समायोजन शुल्काच्या नावाखाली वसूल केला जाणार आहे.

## सैफ अली खान हल्ला प्रकरणात पहिला आरोपी अटकेत : अद्याप दोन आरोपी फरार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६मुंबई**

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान यांच्यावर हल्ला झालेल्या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात यश आलं आहे. कोणत्याही क्षणी पोलीस आरोपीला घेऊन येणार आहेत. तसेच आरोपीला बांद्रा पोलिस स्टेशनमध्ये हजर केले जाऊ शकते अशी माहिती समोर आली आहे. दरम्यान या प्रकरणात सैफवर तीन जणांनी हल्ले केले होते. यातील एकाला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. तर इतर दोन आरोपी अद्याप फरार आहेत.पोलीस त्यांच्या मागावर आहेत.

सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी चोरटा हा लोकल ट्रेनने वांद्रयात आल्याची माहिती आहे.त्यानंतर इमारतीच्या नजीक पोहोचल्यानंतर त्याने दुसऱ्या एका इमारतीत शिरूर सैफच्या इमारतीत शिरकाव केल्याची माहिती सुत्रांकडून



मिळतेय.अशाप्रकारे तो सैफच्या इमारतीत शिरला होता.

इमारतीत जरी चोरटा शिरला असला तरी त्या ठिकाणी कडेकोट सुरक्षा आहे. इमारतीच्या लिफ्टमधून प्रवास करायलाही ॲक्सेस कार्डचा वापर करावा लागतो. त्यात इमारतीच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात सीसीटीव्ही आहेत. त्यामुळे सहजासहजी इमारतीच्या आत शिरणे सोप्पे नाही आहे. मात्र चोरट्याने सैफच्या घरात शिरण्यासाठी इमर्जन्सी पायऱ्यांचा वापर केला होता, अशाप्रकारे हा चोरटा सैफचा घरात शिरला आहे.

दरम्यान आता पायऱ्यांवरून घरात शिरणाऱ्या चोराचं लोकेशन ट्रेस करण्यात पोलिसांना यश आलं आहे. आरोपी प्रभादेवीत असल्याची माहिति होती. त्यानुसार पोलिसांनी चोरट्याला माग काढत त्याला ताब्यात घेण्यात यश आलं आहे.सैफ अली खानच्या घरात तीन हल्लेखोर शिरले होते. यापैकी एका हल्लेखोराला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. तर अद्याप दोन आरोपी फरार आहे.पोलीस या दोन आरोपींचा शोध घेत आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सूरू आहे.

## ‘मांसाहारी लोक देशद्रोही’; पुण्यात मेनका गांधींचं धक्कादायक विधान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ पुणे**

भारताच्या माजी महिला आणि बालविकास मंत्री मेनका गांधी यांनी पुण्यातील एका कार्यक्रमादरम्यान वादग्रस्त विधान केलंय. त्यामुळे त्या पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. पर्यावरणीय चिंता आणि मांसाहारी अन्नावर बोलताना मेनका गांधी यांनी दावा केलाय की मांसाहारी अन्न खाणारे देशद्रोही आहेत. वन्यजीव आणि पर्यावरणावर त्याचा हानिकारक परिणाम होत आहे. त्यामुळे मेनका गांधी यांनी लोकांना शाकाहार स्वीकारण्याचं आवाहन केलंय.



सोशल रिस्पॉन्सबिलीटी ग्रुपच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शेखर मुंदडा, वनिता बोराडे, निवृत्त कर्नल डॉ. नवाज शरीफ, आशिष गोस्वामी, विजय वरुडकर आणि डी. भास्कर हे उपस्थित होते. मनेका गांधी यांच्या वक्तव्यानंतर आता शाकाहारी विरूद्ध मांसाहारी हा वाद उद्भवण्याची शक्यता आहे.

मेनका गांधी म्हणाल्या की, ‘जगातील सर्वाधिक जंगलतोड भारतात होत आहे. गेल्या ३३ वर्षांत ६६ हेक्टर वनजमिनी नष्ट झाली आहे. बदलती जीवनशैली आणि वाढता मांसाहार वन्य प्राण्यांसाठी हानिकारक आहे. म्हणूनच लोकांनी मांसाहारी अन्न खाणे बंद करावे. मांसाहारी अन्न खाणारे लोक या देशाचे देशद्रोही आहेत. वन्य प्राण्यांच्या चामड्यापासून बनवलेले पदार्थ, प्राण्यांची तस्करी, शिकार आणि मांस निर्यात यामुळे जंगलतोड होत आहे, असं देखील त्यांनी स्पष्ट केलंय. गांधींनी असा युक्तिवाद केला की, प्राणी त्यांचे अधिवास गमावत असताना, त्यांना मानवी वस्तीत प्रवेश करण्यास भाग पाडले जाते. वन्य प्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी मांसाहारी अन्न सेवन आणि मांस निर्यातीवर बंदी घालण्याची मागणी देखील मनेका गांधींनी केलीय.

## संपादकीय ......

# इंडिया आघाडीची एक्स्पायरी डेट

केंद्रातील सत्तेपासून भाजपाला रोखण्यासाठी लोकसभा निवडणुकीच्या अगोदर स्थापन झालेल्या इंडिया नामक आघाडीची एक्स्पायरी डेट आता जवळ आली असून आघाडीतील प्रमुख पक्षच विसर्जनाची भाषा बोलू लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत अब की बार ४०० पार अशी घोषणा देणाऱ्या भाजपाला इंडिया आघाडीने २४० जागांवर रोखले. पण नववर्षात इंडिया आघाडीला आपला गाशा गुंडाळण्याची वेळ आली. लोकसभा निवडणुकीत मिळालेले यश विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला टिकवता आले नाही. विशेषतः सत्तेवर येण्याची स्वप्ने पाहणाऱ्या भाजपा विरोधी आघाडीची महाराष्ट्र व हरियाणा या दोन राज्यांत मोठी दुर्दशा झाली. इंडिया आघाडीतील सर्वात मोठा पक्ष असलेल्या काँग्रेसवर आणि काँग्रेसचे नेतृत्व करणाऱ्या राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर आघाडीतील प्रादेशिक पक्षांचा विश्वास राहिलेला नाही आणि काँग्रेस पक्षही आघाडीतील घटक पक्षांना ढुंकून विचारत नाही. दिवसेंदिवस बलाढ्य होत असलेल्या भारतीय जनता पक्षाला काँग्रेस स्वबळावर तोंड देऊ शकत नाही आणि भाजपाशी लढण्यासाठी काँग्रेस इंडिया आघाडीतील घटक पक्षांशी चर्चाही करीत नाही.

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने इंडिया आघाडीतील व राज्यात महाविकास आघाडीतील मतभेद उफाळून आले आहेत. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेस हाच भाजपाचा राजकीय शत्रू नंबर १ आहे आणि दुसरीकडे इंडिया आघाडीतील घटक पक्ष काँग्रेसची झूल नि राहुल गांधींचे नेतृत्व झुगारून देण्याची भाषा बोलत आहेत. इंडिया आघाडीतील असंतोषाचा लाभ भाजपाला मिळतो आहे. म्हणूनच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा भाजपाला शतप्रतिशत यश मिळवून देण्याचा एल्गार पुकारत आहेत. इंडिया आघाडीची अवस्था आयसीयूमध्ये गेल्यासारखी आहे. ही वेळ आघाडीवर आणली कोणी ? लोकसभा निवडणूक निकालानंतर भाजपाला पुन्हा मोठे यश मिळू लागले आहे, त्यामुळे इंडियाचे नेते हबकले आहेत. इंडिया आघाडीवर विसर्जनाची पाळी राहुल गांधी यांच्या वागण्यामुळे आली आहे का, या प्रश्नाने काँग्रेसलाही निरूत्तर केले आहे. राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी म्हटले की, इंडिया आघाडीचा हेतू लोकसभा निवडणुकीत भाजपाला पराभव करणे इतकाच मर्यादित होता. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी म्हटले की, भाजपा विरोधकांमध्ये एकजूट नाही. म्हणून इंडिया आघाडी बरखास्त केली पाहिजे. महाराष्ट्रातील उबाठा सेनेने तर, इंडिया आघाडीची गरज संपली असेल तर काँग्रेसने तसे जाहीर करावे, कोणत्या मार्गाने जायचे ते आम्ही ठरवू. इंडिया आघाडीची निर्मिती कशासाठी झाली होती? पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली देशभर भाजपाचा अश्वमेध चौफेर दौडत आहे, त्यामुळे अनेक राजकीय पक्षांचे अस्तित्वच धोक्यात आले. भाजपा विरोधी मतांचे विभाजन होऊ नये म्हणून इंडिया या बॅनरखाली पक्षांना एकत्र आणून भाजपाला रोखायची रणनिती आखण्यात आली. दि. १८ जुलै २०२३ रोजी बंगळूरु येथे काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, सपा, आम आदमी पक्ष आदी २६ राजकीय पक्ष एकत्र आले व त्यांनी आघाडी स्थापन केली.

इंडियन नॅशनल डेव्हलपमेंट इन्क्लुसिव्ह अलायन्स म्हणजेच इंडिया असे आघाडीचे नामकरण करण्यात आले. काँग्रेसचे मल्लिकार्जुन खरगे यांना आघाडीचे अध्यक्ष करण्यात आले. सन २०२४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला सत्तेतून हटवावयाचे हाच इंडिया आघाडीचा उद्देश होता. बंगळूरुच्या बैठकीत ममता बॅनर्जी यांनी आघाडीचे सारे कार्यक्रम, प्रचार मोहीम, प्रसिद्धी सर्व काही इंडिया या बॅनरखाली असेल असे जाहीर केले. पण आघाडी स्थापन झाल्यावर प्रादेशिक पक्षांकडून काही हादरे बसले, तर काही वेळा अपशकूनही झाले. इंडियाच्या स्थापनेनंतर सहा महिन्यांतच म्हणजे २४ जानेवारी २०२४ रोजी ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये लोकसभा निवडणूक आपला पक्ष स्वबळावर लढणार असल्याचे जाहीर केले. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस दुर्बल आहे. काँग्रेसने तृणमूल काँग्रेसकडे १०-१२ जागांची मागणी केली होती, पण ममता यांनी त्याला साफ नकार दिला. ममता बॅनर्जी इंडिया आघाडीतून बाहेर पडल्या नाहीत किंवा इंडियाशी त्यांनी कधी फारकत घेतली नाही. पश्चिम बंगालमध्ये मेरी मर्जी अशी त्यांची भूमिका कायमच ताठर राहिली आहे. ममता यांच्या स्वबळावरच्या घोषणेच्या पाठोपाठ बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी तर दि. २७ जानेवारी २०२४ रोजी इंडियाला राम राम केल्याची बातमी झळकली. एवढेच नव्हे तर त्यांनी थेट भाजपाप्रणीत एनडीएचा रस्ता धरला. ज्या नेत्याने इंडियाचा पाया रचला तोच भगव्या ब्रिगेडमध्ये निघून गेला. काँग्रेस व उबाठा सेना अगोदरपासूनच मुख्यमंत्रीपदाच्या मुंडावळ्या घेऊन तयार होते. गाफील आघाडीवर भाजपाने मात केलीच पण लाडकी बहीण योजना व ओबीसींनी भाजपा- महायुतीला महाप्रचंड बहुमत दिले. महाआघाडीचे ५० आमदारही निवडून आणता आले नाहीत मग इंडिया हवीच कशाला, अशी खदखद सुरू झाली. लोकसभेत अखिलेश यादव हे अगोदर पुढील रांगेत बसायचे, पण संसदेच्या हिवाळी अधिवेशनात त्यांना मागे ३५५ क्रमांकाचे आसन मिळाले. अखिलेश यांनी धन्यवाद अशी प्रतिक्रिया देऊन नाराजी व्यक्त केली. हरियाणा व महाराष्ट्रातील पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी इंडियाची निर्मिती आपण केली, पण आघाडीचे नेतृत्व बरोबर नाही, मला संधी मिळावी अशी टीप्पणी केली. लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्र, हरियाणा, जम्मू- काश्मीर आणि झारखंड या चारही राज्यांत काँग्रेसचा जबर पराभव झाला. दिल्लीत काँग्रेस व आप एकमेकांच्या विरोधातच लढत आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसला जनतेचा विश्वास मिळवता आला नाही आणि इंडियातील मित्रपक्षांचाही काँग्रेसवर विश्वास राहिलेला नाही. सन २०२५ मध्ये दिल्ली आणि बिहार, सन २०२६ मध्ये आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडू व केरळ, सन २०२७ मध्ये उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणूक आहे. गेल्या सात महिन्यांत इंडिया आघाडीची बैठकच झाली नाही. कोणाची कोणाला गरज वाटत नाही. इंडिया आघाडीची एक्स्पायरी डेट जवळ आली आहे.

# रेशीम उत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी शेतकऱ्यांना मिळणार अनुदान




**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक** – राज्यातील शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळावे यासाठी महारेशीम अभियान राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. हिंगोली जिल्ह्याला रेशीम हब बनविण्याच्या दृष्टीने रेशीम विभागाचे प्रयत्न आहे.

शेतकरी लाभार्थीना एकरी तीन वर्षात या योजनेतंर्गत ४ लाख १८ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. जिल्ह्यात रेशीम शेती फायद्यात असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याची मोठी संधी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना महत्त्व पटवून देण्यासोबतच त्यांना या शेतीकडे आकर्षित करण्यासाठी जिल्ह्यात ९ जानेवारीपासून सुरुवात झाली असून ९ फेब्रुवारीपर्यंत महारेशीम अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानाची सुरुवात जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते रेशीम रथास हिरवी झेंडी दाखवून १४ जानेवारी रोजी करण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी (रोहयो) अनिल माचेवाड, जिल्हा रेशीम विकास अधिकारी पी. एस. देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.रेशीम उद्योग हा कृषीवर आधारित रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला उद्योग आहे. या अभियानादरम्यान जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी रेशीम शेतीसाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी गोयल यांनी केले आहे.यावेळी वरिष्ठ तांत्रिक सहायक अशोक वडवळे, रंगनाथ जांबुतकर, राजू रणवीर, रजनीश कुटे, नितीन लोलगे, केतन प्रधान, कुलदीप हरसुले, राधा पाटील, रमेश भवर, तान्हाजी परघने आदींची उपस्थिती होती.

### रेशीम समग्र-२ योजना...

रेशीम संचालनालयाच्यावतीने केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र-२ ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेतून तुती लागवड, किटक संगोपनगृह बांधकाम, किटक संगोपन साहित्य, तुती लागवड, फळबागा, बाल किटक संगोपन केंद्र, रेशीम कोषापासून धागा तयार करण्यासाठी मल्टिएंड रिलींग मशीनसाठी सर्वसाधारण वर्गासाठी ७५ टक्के अनुदान आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी २० टक्के अनुदान देण्यात येणार आहे.

### शेतकऱ्यांनी नोंदणी करावी

रेशीम शेतीचे महत्त्व, बाजारपेठ उपलब्धता, रेशीम उद्योगासाठी विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे. रेशीम उद्योग करण्यास इच्छुकांची नाव नोंदणी केली जाणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी नाव नोंदणीसाठी या कालावधीत जिल्हा रेशीम कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी देशपांडे यांनी केले आहे.

### मजुरीसाठी २.६५ लाख, तर कुशलचे १.५३ लाख अनुदान

सन २०१७ पासून राबविल्या जात असलेल्या महारेशीम अभियानाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. रेशीम उद्योग लोकाभिमुख होण्यासाठी यावर्षी सुद्धा अभियान आयोजित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रेशीम उद्योग विकास योजना राबविण्यात येणार आहे.




# थंडीमुळे डोळ्यांच्या पापण्या कोरड्या दिसतायत? असं मॉईश्चरायझ करा

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक** – हिवाळ्यात थंड वारे आणि वातावरणातील आर्द्रता यामुळे त्वचा सारखी कोरडी पडते. हात-पाय, चेहरा यांच्यासोबतच डोळ्यांच्या पापण्यासुद्धा काही वेळा कोरड्या होतात. यामागे इतरही अनेक कारणे आहेत. संपूर्ण चेहऱ्यामधील डोळे हा सर्वात महत्वाचा भाग आहे. आपल्या चेहऱ्यावरील सर्वात महत्वाचा व नाजूक अवयव म्हणजे डोळा. डोळ्यांच्या सौंदर्यात भर घालायची असल्यांस आपल्या भुवया आणि पापण्यांच्या केसांची योग्य ती काळजी घेणे गरजेचे असते. आपल्या डोळ्यांचे सौंदर्य जपण्यासाठी नेहमीच महिलांचे प्रयत्न सुरु असतात. हिवाळ्यात गरम पाण्याने अंघोळ केल्याने त्वचा सर्व ओलावा शोषून घेते. त्यामुळे आपली त्वचा कोरडी होऊ लागते.

**एरंडेल तेल**- एरंडेल तेल लावल्यास डोळ्याच्या खालील कोरडेपणा दूर होण्यास मदत होईल. एरंडेल तेल म्हणजेच कॅस्टर ऑईल. एरंडेल तेल हे केसांसाठी आणि त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. या तेलात असलेले मॉइश्चरायझिंग गुणधर्म आपल्या शरीराला आर्द्रता पुरवतात. हे तेल डोळ्यांना लावल्याने डोळ्यातील अश्रूंमध्ये असलेले नैसर्गिक तेल वाढण्यास मदत होते. अशा स्थितीत तुमच्या पापण्या कोरड्या होत नाहीत. डोळ्यांखालील काळी वर्तुळे आणि खाज किंवा जळजळ येण्याची समस्याही दूर होण्यास मदत होते.

**गुलाबजल लावा**- कधीकधी हिवाळ्यात, हीटरसमोर जास्त वेळ बसल्याने देखील पापण्या कोरड्या किंवा चिकट होऊ शकतात. यासाठी कापूस घ्या, तो हलकेच गुलाबजलामध्ये बुडवा आणि पापण्यांवर लावा. असे केल्याने तुमच्या डोळ्यांना त्वरित थंडावा आणि आराम मिळेल. पापण्या चिकट सुद्धा राहणार नाहीत व कोरडेही दिसणार नाहीत.

**योग्य आहार** – कधी कधी आपण नको ते प्रयोग करतो पण ते कामी येत नाही, काही तरी अपूर्ण राहूनचं जातं. पापण्या कोरड्या होण्याचं आणखी एक मुख्य कारण म्हणजे अपूर्ण आहार. तुमचा आहार अगदी नीट असावा तुम्ही तुमच्या आहाराकडे लक्ष द्या. जीवनसत्त्वे आणि खनिजे यांनी समृद्ध अन्नपदार्थांचा समावेश तुमच्या



आहारात करा. संत्री, मोसंबी यासारखी फळे आणि हिरव्या पालेभाज्या खाण्याला प्राधान्य द्या.

**बदामाचे तेल**- बदामाचे तेल त्वचा आणि केसांची काळजी घेण्यासाठी देखील वापरले जाते. पापण्या जाड करण्यासाठी, बदामाच्या तेलात मस्कराचा स्वच्छ ब्रश बुडवा आणि पापण्यांना लावा. असे सतत केल्याने तुमच्या पापण्यांची लवकर वाढ होईल आणि तुमची केमिकल युक्त सौंदर्य प्रसाधनांपासून सुटका होईल.

**एलोवेरा जेल**- एलोवेरा जेल आपल्या त्वचेसाठी जितके चांगले असते तितकेच पापण्यांची जाडी आणि घनदाट करण्यासाठी ते अधिक प्रभावी आहे. काजळ लावण्याची स्टिक पूर्णपणे स्वच्छ करा आणि त्याचा वापर करून पापण्यांवर कोरफड जेल लावा. या उपायाचा अवलंब करत राहिल्यास पापण्यांची वाढ झपाट्याने होते.

**खोबरेल तेल** खोबरेल तेल लावल्याने पापण्यांचे केस जाड आणि घनदाट होण्यास मदत होते. पापण्यांसाठी खोबरेल तेलाचा वापर केल्यास पापण्या जाड आणि लांब होतात. रोज रात्री झोपताना पापण्यांना खोबरेल तेलाने हलक्या बोटांनी मसाज केल्यास पापण्या लांब आणि घनदाट होतात.

# आंबा पिकातील पुनर्मोहर व कीड-रोग नियंत्रणासाठी कोणत्या फवारण्या घ्याव्यात? वाचा सविस्तर

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक** – हवामानात सतत होणाऱ्या बदलामुळे आंबा पिकावर संक्रांत आली आहे. थंडी, कडकडीत ऊन, उष्मा या संमिश्र हवामानाचा परिणाम झाल्याने तुडतुडा, थ्रीप्सचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

शिवाय पुनर्मोहर सुरू झाल्याने बागायतदार धास्तावले आहेत. खत व्यवस्थापनापासून आंबापीक बाजारात येईपर्यंत लाखो रूपये खर्च करावे लागतात. त्यातच नैसर्गिक संकटामुळे पीक धोक्यात येऊन बागायतदारांना याचा फटका बसत आहे.

सद्यस्थितीत कसे कराल आंबा पिकाचे व्यवस्थापन

आंबा फळावरील फळमाशी या किडीच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन झाडाखाली व बुंध्याजवळील जमिन हिवाळ्यात १० ते १२ सेमी खोल नांगरुन घ्यावी. त्यामुळे फळमाशीचे सुप्त अवस्थेतील कोष नष्ट होऊन भविष्यातील प्रादुर्भावाची तीव्रता कमी होण्यास मदत होते.

ढगाळ वातावरण व आध्रता यामुळे आंबा पिकावर तुडतुड्यांची पैदास मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. तुडतुड्यांनी आर्थिक नुकसानीची पातळी (पालवी/मोहोर अवस्था १० तुडतुडे प्रती पालवी/मोहोर) ओलांडली असल्यास कीटकनाशकाची फवारणी करण्यात यावी यासाठी पोपटी रंगाच्या पालवीवर डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही ९ मि.ली. प्रती




१० लिटर पाणी, बोंगे फुटताना लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रती १० लिटर पाणी, मोहोर फुलण्यापूर्वीच्या अवस्थेत इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि.ली. किंवा ब्युफ्रोफेझीन २५ टक्के प्रवाही २० मि.ली. प्रति १० लिटर पाणी आणि मोहोर फुलल्यानंतर कणी अवस्थेत असताना थायोमेथोक्झाम २५ टक्के दाणेदार १ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.


भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

टीपः मोहोर नुकताच फुलत असताना ते फलधारणा होईपर्यंत किटकनाशकाची फवारणी




शक्यतो टाळावी. फवारणी करणे गरजेची असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांवर होणारा परिणाम टाळण्यासाठी परागीकरणाचा कालावधी वगळून (सकाळी ०९.०० ते १२.००) फवारणी करावी. किटकनाशक किंवा बुरशीनाशकाची फवारणी शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस करावी.

किमान तापमानात होणारी घट यामुळे आंब्याच्या फळे धरलेल्या फांद्यावर पुन्हा नवीन मोहोर येण्याची शक्यता असते. त्यामुळे अन्नाचे वहन नवीन मोहोराकडे होवून जुन्या मोहोराला असलेली वाटाणा/गोटी आकाराच्या फळांची गळ दिसून येते. यासाठी मोहोर अवस्थेत असलेल्या आंबा झाडावर पुर्नमोहोर प्रक्रिया टाळणेसाठी जिब्रेलिक ॲसिड या संजीवकाची ५० पी.पी.एम म्हणजेच १ ग्रॅम प्रती २० लिटर पाण्यात मिसळून स्वतंत्र फवारणी झाडाला पुरेसा मोहोर आला असल्याची खात्री झाल्यानंतरच झाडावरील मोहोर पूर्ण उमललेला असताना आणि नंतर पुन्हा मोहरीच्या आकाराची फळे झाल्यावर करावी. जिब्रेलिक ॲसिडची पावडर पाण्यात अविद्राव्य असल्याने प्रथम ती थोड्या अल्कोहोल मध्ये विरघळून नंतर पाण्यात मिसळावी.




कमी झालेल्या किमान तापमानामुळे व इतर हवामान घटकांच्या अनुकुलतेमुळे काही ठिकाणी आंबा पिकामध्ये मोहोर धारणा होत आहे. अशा ठिकाणी कोंकण कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार मोहोरलेल्या झाडांना फळगळ कमी होऊन चांगली फळधारणा होण्यासाठी आमशक्ती या विद्राव्य अन्नद्रव्याची १ लि. प्रती १९ लि. पाणी या प्रमाणात फवारणी करावी. सदर २० लि द्रावण हे चार मोहोरलेल्या झाडांसाठी वापरावे.

मोहोर धारणा होऊन १५ ते २० दिवस झालेल्या आंबा बागामध्ये काही ठिकाणी फळधारणा होऊन काही ठिकाणी फळे कणी व वाटाणा आकाराची आहेत अशा बागामध्ये चांगल्या प्रतिच्या आंबा फळाच्या उत्पादनाबरोबर आंब्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी १% पोटॅशिअम नायट्रेटची (१० ग्रॅम प्रति लिटर पाणी) फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना अशा एकुण ३ फवारण्या कराव्यात.

वाढणारे किमान तापमान लक्षात घेता हापुस आंब्यामध्ये फळगळ कमी करण्यासाठी फळे वाटाण्याच्या आकाराची झाल्यावर २० पीपीएम नॅप्थलीन ॲसीटीक ॲसीड (१ ग्रॅम ५० लिटर पाण्यातुन) या संजीवकाचे द्रावण मोहोरावर फवारावे. दुसरी फवारणी फळे गोटीच्या आकाराची झाल्यावर करावी. नॅप्थेलीन ॲसीटीक ॲसीड प्रथम थोड्या अल्कोहोलमध्ये विरघळुन नंतर पाण्यात मिसळावे.

**– ग्रामीण कृषि मौसम सेवा .** डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

# कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत इस्त्राईलमधील नॉनवॉर झोनमध्ये घरगुती सहाय्यक पदासाठी रोजगाराची संधी




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत अमरावती विभागातील पुरुष व स्त्री उमेदवारांना, इस्त्राईल येथे घरगुती सहायक या कामासाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. इच्छुकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालयाचे उपायुक्त द.ल.ठाकरे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे. इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या २५ ते ४५ वयोगटाचे उमेदवार या संधीचा लाभ घेण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे घरगुती सहायक (केअश इरीशव उरीशसळींशी) सेवांसाठी निपुण/ पारंगत, भारतातील सक्षम नियामक प्राधिकरणाव्दारे मान्यताप्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. भारतीय संबंधित भारतीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली किंवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक, तसेच जीडीए/ एएनएम/जीएनएम/ बीएससी नर्सिंग/पोस्ट बीएससी नर्सिंगची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.

**नोकरीचे वर्णन व तपशील पुढीलप्रमाणे :** घरगुती सहायक (केअश इरीशव उरीशसळींशी) पदाचे नाव असून त्यास किमान पात्रता – १०वी उत्तीर्ण, अनुभव, डिप्लोमा आणि प्रमाणपत्र – काळजीवाहक (उरीशसळींशी) सेवा प्रदान करण्यासाठी पात्र आणि भारतातील सक्षम नियामक प्राधिकरणाकडून जारी केलेले प्रमाणपत्रधारक असावा, जो ९९० तासांच्या मान्यताप्राप्त किंवा संबंधित भारतीय अधिकाऱ्यांद्वारे पर्यवेक्षण केलेला, किंवा पूर्णत्व सिद्ध करणारा डिप्लोमा यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे दाखवणारे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स सहाय्यक, किंवा प्रसूतीशास्त्र प्रशिक्षण पूर्ण केलेला, ज्याच्याकडे संबंधित भारतीय प्राधिकरणांकडून डिप्लोमा मान्यताप्राप्त आहे. इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक वयोमर्यादा – २५ ते ४५ वर्षे. पुरुष/स्त्री उमेदवार पात्र. उंची/ पासपोर्ट वैधता – किमान ३ वर्षे. इतर आवश्यकता उमेदवाराने पूर्वी इस्त्राईलमध्ये काम केलेले नसावे. त्याचा/तिचा जोडीदार, पालक किंवा मुले इस्त्राईलमध्ये सध्या काम करत असू नयेत किंवा इस्त्राईल रहिवासी नसावा. उमेदवारांनी अधिक माहितीसाठी स्थानिक जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १६ जानेवारी २०२५ — शहर/ग्रामिण


# काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदासाठी यशोमती ठाकुर, विश्वजित कदम यांच्या नावांची चर्चा

## अमित देशमुख यांचेही नाव शर्यतीत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती–**
भाजपच्या प्रदेशाध्यपदाच्या बदलानंतर आता काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदा कडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदावरून नाना पटोले पायउतार होणार असून, नव्या प्रदेशाध्यक्षपदासाठी अनेक नेत्यांची नावे चर्चेत आहेत, तर या पदासाठी तरुण चेहर्‍याला पक्ष संधी देणार का असेल, अशी चर्चा काँग्रेस पक्षात रंगली आहे. विश्वजीत कदम, माजी मंत्री यशोमती ठाकूर आणि माजी मंत्री अमित देशमुख यांची नावे या पदासाठी चांगलीच चर्चेत आहेत. लवकरच याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर नानापटोले यांची प्रदेशाध्यक्ष पदी वर्णी लागली होती. त्यांच्या प्रदेशाध्यक्षपदाच्या कारकिर्दीला आता चार वर्षे झाली आहेत.त्यांच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या कारकिर्दीमध्ये काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मोठं यश मिळावलं. मात्र, विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला. यामुळे पटोले यांना हटवण्याची मागणी पक्षातून केली जात आहे. काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडून नव्या प्रदेशाध्यक्षपदासाठी तरुणनेत्यांची चाचपणी सुरू असल्याची चर्चा आहे. पक्षामध्ये पुन्हा उत्साह निर्माण करेल, अशा नेतृत्वाच्या शोधात काँग्रेस असल्याची चर्चा आहे. त्यामुळे बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण, विजय वडेट्टीवार यासह वरिष्ठ नेत्याच्या नावांच्या चर्चा असतानाच आता पुन्हा एकदा पदासाठी नेमकी कोणाची वर्णी लागणार ते पाहणं महत्वाचं ठरणार आहे.प्रदेशाध्यक्षपदासाठी यशोमती ठाकूर यांचं देखील नाव विदर्भातून पुढे चर्चेत येत आहे. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने विदर्भात आधिक जागा जिंकल्या आहेत. लोकसभेत काँग्रेसला विदर्भामध्येनाना पटोले आणि विजय वडेट्टीवार यांचं नाव विधिमंडळ गटनेतेपदासाठी चर्चेत आहे. पटोले किवा वडेट्टीवार यांच्यापैकी कोणालाही विधिमंडळ गटनेते बनवले तर प्रदेशाध्यक्षपदमराठवाड्याकडे किंवा पश्चिम महाराष्ट्राकडे जावू शकते, अशी चर्चा आहे.

# तीन दिवसात १७४४ प्रलंबीत तक्रारींचे अर्ज निकाली

## बुधवारी ८६० तक्रारीचा ऑनद स्पॉट निपटारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती** पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी पोलिस ठाण्यातील नागरिकांच्या प्रलंबीत तक्रारी तातडीने निकाली काढण्यासाठी वसंत हॉल येथे १३ जानेवारी पासून तक्रार निवारण कार्यशाळा सुरू केली होती. गत तिन दिवस–ांमध्ये आयुक्तालयातील सर्व पोलिस ठाण्यातील तब्बल १७४४ तक्रार अर्जाचा ऑन द स्पॉट निपटारा झाला. आज १५ जानेवारी रोजी एकूण ८६० प्रलंबीत अर्ज म्हणजे तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. ही कार्यशाळा १६ जानेवारी पर्यंत सुरू राहणार असून आगामी दोन दिवसांमध्ये शेकडो तक्रारीं निकाली निघण्याची शक्यता आहे.शहरातील नागरिक पोलिस ठाण्यात किंवा पोलिस आयुक्तालयातील आवक–जावकमध्ये तक्रारी करतात. बहुतांश जण सीपींना भेटून त्याच्याकडे तक्रारी करतात. अशा तक्रारी पत्रव्यवहार शाखे मार्फत संबधीत पोलिस ठाण्यात जातात. दरम्यान पोलिस ठाण्यांमध्ये दैनंदिन कामकाज, बंदोबस्त, तपास, आरोपींची शोध अशा अनेक कारणांमुळे तक्रार अर्ज पेडींग राहत

असल्याने नागरिकांना प्रचंड मनस्ताप होतो त्यामुळे सीपी रेड्डी यांनी स्वतः वसंत हॉल येथेनागरिकांसाठी १३ ते १६ जानेवारी दरम्यान तक्रार निवारण कार्यशाळा सुरू केली. हॉलमध्ये दहा पोलिस ठाण्यांसह वाहतुक पोलिस व इतर शाखांचे टेबल लावण्यात आले. एका दिवशी एकाच वेळी दहाही पोलिस ठाण्यातील प्रलंबीत अर्जावर सीपींच्या निगरानीमध्ये कारवाई होत असल्याने अनेक अर्ज निकाली निघत आहे.

त्यानुसार १३ जानेवारीला ४८२, १४ जानेवारी ला ४०२ व आज ८६० तक्रार अर्ज निकाली काढण्यात आले. आज १६ जानेवारीलाही कार्यशाळा सुरू राहणार असून नागरिकांना त्यांनी केलेल्या तक्रारीची माहिती हवी असल्यास वसंत हॉलमध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सीपी रेड्डी यांनी केले आहे.

# कामगार विभाग पथकाने केली तीन बाल कामगारांची मुक्तता

## बडनेरा ठाण्यात संबंधितांविरोधात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती–**
कामगार विभागाच्या पथकाने बुधवारी तीन बाल कामगारांची सुटका केली. ही कारवाई बडनेरा येथील कोंडेश्वर रस्त्यावरील पांचरे ब्रिक्स येथे करण्यात आली. याप्रकरणी संबंधितांविरोधात बडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कामगार उप आयुक्त नितीन पाटणकर यांच्या निर्देशानुसार व सहाय्यक कामगार आयुक्त मोहसीन सय्यद तसेच सरकारी कामगार अधिकारी राहुल काळे परीविक्षाधीन अधिकारी श्रीकांत झंवर, गिरीजादेवी लोखंडे यांच्या मार्गदर्शनात बाल व किशोरवयीन कामगार नियमन व निर्मूलन अधिनियम १९८६ व सुधारित अधिनियम २०१६ अंतर्गत, बाल व किशोरवयीन कामगार मुक्ती अभियान राबवण्यात आले. सदर कारवाई दरम्यान बडनेरा हद्दीतील कोंडेश्वर येथील पांचरे ब्रिक्स येथील तीन बाल कामगारांची सुटका करण्यात आली.ही कारवाई दुकाने निरीक्षक शिवराज नेने यांचे नेतृत्वात निरीक्षक संजय पांडे, संगीता गुल्हाने, तुषार देशपांडे दो. ढोले, स. ल. जेवणे व जिल्हा बाल संरक्षण कक्ष चाईल्ड लाईन यांनी संयुक्तपणे ही कार्यवाही केली.

# आरटीई प्रवेश प्रक्रिया सुरु....

## दोन दिवसांत ३३० ऑनलाईन अर्ज

- २७ जानेवारीपर्यंत अर्जाची मुदत
- २ हजार ४६० जागांवर प्रवेश मिळणार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**
आरटीई प्रवेशप्रक्रियेत जिल्ह्यात २२५ शाळामध्ये २ हजार ४३० जागा उपलब्ध असून याची ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया १४ जानेवारीपासून सुरू झाली आहे. दोन दिवसांत ३३० बालकांचे प्रवेश अर्ज दाखल करण्यात आले आहे.

जिल्ह्यात आरटीई प्रक्रियेला १६ डिसेंबर पासून सुरूवात करण्यात आली. यामध्ये ४ जानेवारीपर्यंत पहील्या टप्प्यात शाळा नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली. यादरम्यान जिल्ह्यातील पात्र २३९ शाळांपैकी २२५ शाळांची नोंदणी करण्यात आली आहे. नोंदणी झालेल्या शाळांच्या पटसंख्येच्या २५ टक्केच्या प्रमाणात २ हजार ४३० जागा निश्चित करण्यात आल्याने या जागांवर बालकांचे प्रवेश केले जाणार आहे. याकरीता १४ फेब्रुवारीपासूनऑनलाईन अर्ज स्विकारल्या जात आहे. यंदा प्रवेश प्रक्रियेला वेळेवर सुरूवात झाल्याने पालकांचे मोठ्या प्रमाणात अर्ज येत आहेत. अशात दोन दिवसांमध्ये ३३० बालकांचे ऑनलाईन अर्ज शिक्षण विभागाकडे प्राप्त झाले आहेत. या करीता २७ जानेवारीची डेडलाईन देण्यात आली असून १३ दिवसांत किती अर्ज दाखल होतात याकडे लक्ष लागले आहे. शिक्षण विभागाकडे प्राप्त झालेल्या अर्जाची पडताळणी करून पुणे येथे लॉटरी काढली जाणार आहे. त्यानंतरच खर्‍या अर्थाने प्रवेश प्रक्रिया राबविली जाईल. यंदा मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे. पालकांनी त्वरीत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

# अमरावती – मुंबई, पुणे २ वंदे भारत ट्रेन मिळणार

## अमरावतीकरांसाठी आनंदाची बातमी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**
अमरावतीकरांसाठी आनंदाची बातमी आहे. लवकरच अमरावतीमधून मुंबई आणि पुण्याला जाण्यासाठी वंदे भारत ट्रेन धावणार आहेत. रेल्वे प्रशानाने मुंबई– अमरावती आणि पुणे– अमरावती या २ वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात फक्त पुणे आणि मुंबई या ठिकाणावरून वंदे भारत ट्रेन धावतात. मुंबईतून धावणाऱ्या या वंदे भारत ट्रेन सध्या सोलापूर, शिर्डी, गोवा, कोल्हापूर शहरांमध्ये जातात. आता मुंबईवरून अमरावती आणि पुण्यातून अमरावतीसाठी वंदे भारत ट्रेन धावणार असल्याची माहिती समोर आली आहे.

### मुंबई – अमरावती वंदे भारत ट्रेन

अमरावती रेल्वेस्थानकावरून पहाटे ३ वाजून ४० मिनिटांनी 'मुंबई वंदे भारत एक्स्प्रेस' सुटेल. ही ट्रेन साडे सहा तासांमध्ये म्हणजे सकाळी ११ वाजून १० मिनिटांनी मुंबईत पोहोचेल. ही ट्रेन अमरावतीनंतर अकोला जंक्शन, शेगाव, भुसावळ जंक्शन, जळगाव जंक्शन, मनमाड आणि नाशिक जंक्शन या रेल्वे स्थानकावर थांबेल. यानंतर ही वंदे भारत ट्रेन मुंबईवरून दुपारी ३ वाजून ५ मिनिटांनी अमरावतीकडे परतीच्या प्रवासासाठी रवाना होईल. यानंतर रात्री ११ वाजून २५ मिनिटांनी अमरावती स्थानकावर पोहचेल.

याबाबतचा प्रस्ताव मध्य रेल्वे प्रशासनाकडून केंद्राकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. या वंदे भारत ट्रनेचे संभाव्य वेळापत्रक देखील तयार आहे. या वंदे भारत ट्रेनमुळे विदर्भ आणिउत्तर महाराष्ट्रातील नागरिकांना फायदा होणार आहे आणि त्यांचा प्रवास सुसाट होणार आहे.

# महिला कामगारांना शरीरसुखाची मागणी करणाऱ्या टेक्सटाईल पार्कच्या व्यवस्थापकाविरुध्द गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती–**
नांदगावपेठ येथील मे. गोल्डन फायबर्स एलएलपी, टेक्सस्टाईल पार्कच्या व्यवस्थापकाविरुध्द नांदगावपेठ पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरून विनयभंगाचा गुन्हा दाखल केला. जॉन रावत (वय ६२ रा. एमआयडीसी, नांदगावपेठ) असे गुन्हा दाखलत झालेल्या व्यवस्थापक आरोपीचे नाव आहे.नांदगावपेठ येथील मे. गोल्डन फायबर्स एलएलपी, टेक्सस्टाईल पार्क कंपनीमध्ये शहरासह आसपासच्या गावातील ६०० महिला कामगार आहेत. तसेच कंपनीमधील व्यवस्थापक जॉन रावत हा नेहमी महिला कामगारासोबत अश्लिल भाषेचा वापर करून त्यांना शरीरसुखाची मागणी करतो. २२ जून २०२४ रोजी कंपनीमधील एका महिला कामगाराचे डोके दुखत असल्यामुळे ती डोक्याला हात लावून बसली होती. तेव्हा रावत कंपनीमध्ये आला. त्याला महिलाबसलेली दिसताच त्याने विचारपूस केली असता तिने डोके ये दुखत असल्याचे सांगितले, तेव्हा रावतने। तिला शरीरसुखाची मागणी केली. तसेच तुझे सर्व प्रॉब्लेम सुटतील. हे ऐकताच महिलेला धक्का बसला आणि तिची प्रकृती बिघडून ती चक्र येऊन खाली पडली. हे पाहताच कंपनीमधील कर्मचारी अक्षय ठाकरे, मंगेश वैद्य आणि एक महिला धावत आली. पीडिताने घडलेला सर्व प्रकार त्यांना सांगितला. तसेच रावत नेहमीच त्रास देतो तसेच वाईट नजरने पाहतो, रावतचा त्रास ! जास्त वाढल्यामुळे महिलेने नांदगावपेठ ठाण्यात धाव घेतली. परंतु पोलिसांनी गुन्हा दाखल न केल्यामुळे तिने मनसेच्या कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरयू पाजणकर यांना घडलेला! प्रकार सांगितला. त्यानंतर मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी पोलीस आयुक्त सागर पाटील यांची भेट घेऊन रावतविरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. तेव्हा पोलिसांनी रावतविरुध्द विनयभंगाचा गुन्हा दाखल केला.

# महिला वनरक्षकासोबत धक्काबुक्की करून मिनीट्रक पळविला

## चांदुर बाजार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६चांदुर बाजार–** वनविभागाच्या चेकपोस्ट पाईन्टवर तैनात असलेल्या महिला वन रक्षकाला हिरव्या रंगाच्या टाटा ४०७ मिनिट्रकवर संशय असल्याने त्यांनी ट्रकला थांबण्याचा इशारा दिला असता ट्रक चालक पळून गेला. त्यानंतर महिलावनरक्षकाने पाठलागकरून ट्रकला पकडले असता ट्रक चालकाने वनरक्षकासोबत धक्काबुक्की करून मिनिट्रक पळविला. चांदुर बाजार पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या परिसरात ही घटना घडली.माहितीनुसार, तक्रारकर्त्या ३४ वर्षीय महिला वनरक्षक या १३ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास चांदुर बाजार पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या ब्राम्हणवाड टी पाईन्टवरील वनविभागाच्या चेकपोस्टवर तैनात होत्या. दरम्यान, महिला वनरक्षकाला एमएच–२७–सी–०५४८ क्रमांकाच्या मिनिट्रकवर संशय आल्याने त्यांनी ट्रकला थांबविण्याचा इशारा दिला. परंतु, ट्रक भरधाव वेगाने निघून गेल्याने महिलेने पथकासह ट्रकचा पाठलाग करून काही अंतरावर ट्रकला थांबविले. महिला वनरक्षकाने चालक मोहम्द अमीन मोहम्मद शाकीर (२५) रा. शिरजगावबंड, ता. चांदुर बाजार याला ट्रकची तपासणी करायचे असल्याचे सांगताच मो. अमीनने महिला वनरक्षकाला धक्काबुक्की करून मिनिट्रक तेथून पळविला. त्यामुळे महिलेने याबाबत चांदुर बाजार पोलिस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी मो. अमीन विरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# आता पोलिस ठाण्यात दर शनिवारी तक्रार निवारण दिन

## अर्जदार, गैरअर्जदारांसमोर होणार तक्रारींचा निपटारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती–**
अमरावती ग्रामीणच्या सर्व पोलिस ठाण्यांमधील पेडींग तक्रार अर्ज तातडीने निकाली काढण्यासाठी एसपी विशाल आनंद यांनी आता सर्व पोलिस ठाण्यात दर शनिवारी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत तक्रार निवारण दिन आयोजित करण्याचे आदेश दिले. अर्जदार, गैर अर्जदारांना आमने–सामने बसवून तात्काळ ऑन द स्पॉट निपटारा होणार असल्याने अर्जदारांना दिलासा मिळणार आहे.नागरिक पोलिस ठाण्यात किंवा पोलिस अधिक्षक कार्यालयातील आवक–जावकमध्ये तक्रारी करतात. बहुतांश जण एसपींना भेटून त्याच्याकडे तक्रारी करतात. अशा तक्रारी पत्रव्यवहार शाखे मार्फत संबधीत पोलिस ठाण्यात दरम्यान जातात. पोलिस हाण्यांमध्ये दैनंदिन कामकाज, बंदोबस्त, तपास, आरोपींची शोध अशा अनेक कारणांमुळे तक्रार अर्ज पेडींग राहत असल्याने नागरिकांना प्रचंड मनस्ताप होतो.विशाल आनंद त्यामुळे एसपी विशाल आनंद यांनी आता प्रत्येक शनिवारी पोलिस ठाण्यात सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्याचे आदेश सर्व ठाणेदारांना दिले आहे. तक्रार करण्यासाठी आलेल्या नागरिकांची रितसर नोंद करून त्यांच्या तक्रारीचे अनुषंगाने केलेल्या कारवाईची माहिती तात्काळ वरिष्ठांना पाठविण्याचेही आदेश देण्यात आले आहे. पोलिस विभागाच्या कामकाजात पारदर्शकता यावी, नागरिकांसोबत सलोख्याचे नागरिकांसोबत सलोख्याचे संबध निर्माण व्हावे हा देखील एक उद्देश्य असल्याचे एसपी विशाल आनंद यांनी सांगितले. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांनी आपल्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही एसपी विशाल आनंद यांनी केले आहे.

# वाळूचे डेपो बंद, घाटांचे पुन्हा लिलाव

## धोरणात्मक बदल करण्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांचे संकेत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती –**
६ जिल्ह्यातील ७ पैकी ६ वाळू डेपो बंदकरण्यात आले, तर मोर्शी येथे एकमेव डेपो सुरू आहे. अहवालानंतर अधिकाऱ्यांनीही डेपो बंद केल्याची माहिती दिली. १५ दिवसात नवीन वाळू धोरण जाहीर करण्यात येईल, सर्व वाळू डेपोची तपासणी करण्याचे आदेश शासनाने जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. त्यानुषंगाने प्रशासत, चौकशी करणार आहे.

महाराष्ट्र सरकारकडून वाळू घाट लिलाव पुन्हा जुन्याच पद्धतीने होणार आहे, असे संकेत नवे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. वाळू डेपोपद्धतीत बदल करून पूर्वीप्रमाणे घाटांचा लिलाव केला जाणार आहे. सध्या सुरू असलेल्या वाळू डेपोचा अहवाल शासनाने स्थानिक प्रशासनाला मागितला आहे. हा अहवाल लवकरच सादर केला जाईल. पावसापूर्वी वाळूघाटांचे लिलाव होण्याची शक्यता आहे. या अहवालात सध्याच्या धोरणातील त्रुटी, सर्वसामान्यांना वाळूचा पुरवठा केला जात आहे की नाही, आदी बाबींवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ७ पैकी ६ वाळू डेपो बंद करण्यात आले, तर मोर्शी येथे एकमेव डेपो सुरू आहे. अहवालानंतर अधिकाऱ्यांनीही डेपो बंद केल्याचीमाहिती दिली. वाळू डेपोसाठी ठरवून दिलेले नियम व अटी पाळल्या जात आहेत की नाही. जिल्हा मुख्यालयात मंगळवारी सादर होणाऱ्या वाळू डेपोची तपासणी अधिनस्त गौण खनिज अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुरू केली आहे. याचा वाळू तस्करीवर काय परिणाम होतो यावर मात्र सर्वांच्या नजरा त्याकडे लागल्या आहेत. तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांनी वाळू डेपोचे धोरण राबवले होते. नागरिकांना स्वस्तात वाळू विकण्यासाठी शासनामार्फत वाळू लिलाव करून त्या ठिकाणी वाळू डेपो सुरू करण्याची तरतूद होती. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी वाळू डेपोची किंमत ग्राहकांना देण्यासाठी धोरणात सुधारणा करण्यात आली. त्याचा परिणाम असा झाला की, दिशा न मिळाल्याने स्वस्त वाळू महागली आणि वाळूची विक्री ठप्प झाली.

# नांदगाव पेठ मधील श्री गोविंदप्रभू तीर्थस्थान उपेक्षितच

## शासनाने दखल घेण्याची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नांदगाव पेठ**

येथील श्री गोविंद प्रभू तीर्थस्थानाचा या पाच वर्षात बराच कायापालट झाला असला तरी मुख्य प्रवेशद्वारामुळे आजही हे पुराण प्रसिद्ध तीर्थस्थान उपेक्षितच आहे.महानुभाव पंथीयांच्या धार्मिक ग्रंथात साडेआठशे वर्षांपूर्वी श्री गोविंद प्रभुचे अडीच दिवसाचे वास्तव्य या ठिकाणी असल्याचा स्पष्ट उल्लेख आढळून येतो. पंजाब, दिल्ली पासून महानुभाव पंथीय या ठिकाणी दर्शनाला येत असतात.महानुभाव पंथीयांच्या या पवित्र तीर्थक्षेत्राला मुख्य प्रवेशद्वार नसल्याने भाविकांना मोठी अडचण निर्माण होत आहे. रामबिलासजी सारडा यांच्या वाड्यात उपेक्षित अवस्थेतील या स्थानाला उर्जिता अवस्था प्राप्त करून देण्याचा संकल्प विनय मुनी, गोवर्धन मुनी, उद्धव मुनी या दर्यापूरकर बाबांच्या शिष्यवर्गाने घेतला. अतिशय वाईट परिस्थितीत ( पाणी, वीज याचीही सोय नसताना) संघर्ष करीत दशलक्ष नामस्मरण करीत आज नित्यनेमाने पहाटेपासून निद्रेपर्यंत त्रिकाळ पूजा अवसर, यासह सर्व धार्मिक कार्यक्रम या तीर्थावर होत आहे. भक्त भाविकांनाही सोयी सवलती मिळत असल्याने दिवसेंदिवस भक्तांची वर्दळ वाढत आहे.

हळूहळू श्री गोविंद प्रभू तीर्थस्थान ट्रस्ट स्थापन झाली. मंदिरालगतची नवल किशोर मालपाणी यांची दोन हजार चौरस फूट जागा खरेदी करून अंदाजे ३० लाख रुपये खर्च करून सभागृहाचे बांधकाम पूर्णत्वास जात आहे. सद्यपरिस्थितीत मंदिर असलेली तीन हजार सहाशे चौरस फूट जागा ॲड.सतीश सारडा, जय किशोर सारडा यांच्याकडून अठराशे चौरस फूट जागा मंदिर बांधकामास अडचण येऊ नये म्हणून नरेश जी सारडा यांच्याकडून विकत घेण्यात आली. ट्रस्टच्या मालकीची जागा झाली. तीर्थक्षेत्र विकास निधीतून या क दर्जा प्राप्त तीर्थस्थानावर एक स्वतंत्र सभागृह बांधून मिळाले. आजी-माजी खासदार, आमदार वेळोवेळी भेटी देत असतात. ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेचाही विकास कार्यात सहभाग आहे. सातत्याने पाच वर्षापासून वार्षिक कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. उर्जिता अवस्थेकडे घोडदौड सुरू असली तरी शेकडो संत महंत, लाखो भक्त भाविक अतिशय श्रद्धेने ज्या भव्य प्रवेशद्वारातून या चरणांकीत स्थान दर्शनाला येत असतात त्याच प्रवेशद्वारावर आजही ट्रस्ट आपला हक्क सांगू शकत नाही ही खंत बाहेर गावावरून येणाऱ्या भक्त भाविकांसह गावातील सामान्य जन ही व्यक्त करीत आहे. वार्षिक कार्यक्रमाचे हे पाचवे वर्ष असून यावर्षी २६ व २७ जानेवारीला भव्य स्वरूपात कार्यक्रमाची आखणी होत असताना, भक्त भाविकांच्या सहनशक्तीचा अंत न पाहता, भाविक भक्तांची ही खंत त्वरित दूर व्हावी अशी भक्तांची मागणी आहे. ऐतिहासिक आणि महत्वाचे स्थान असल्याने दरवर्षी हजारो भाविकभक्त याठिकाणी दर्शनाला येतात त्यामुळे या तीर्थक्षेत्राला मुख्य प्रवेशद्वार व्हावे अशी मागणी भावीकांकडून करण्यात येत आहे.

# जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पीक विम्याची मदत तात्काळ वाटप करा !

## संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवणाऱ्या विमा कंपनीवर गुन्हे दाखल करा !

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१६मोर्शी–** अमरावती जिल्ह्यामध्ये मोर्शी वरूड चांदुर बाजार, अचलपूर, तिवसा यासह विविध तालुक्यामध्ये हवामान आणि भौगोलिक परस्थितीनुसार संत्रा फळांची लागवड हजारो हेक्टर क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात केली जाते. जेवढे अधिकचे उत्पन्न यामधून आहे. तेवढ्याच प्रमाणात तोटाही आहे. त्यामुळेच पिकांना हवामान धोक्यांपासुन विमा संरक्षण दिल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्याच्या दृष्टीने मदत होईल या करीता जिल्ह्यातील हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी हेक्टरी १२ हजार रुपये भरून २०२३ - २४ मध्ये आंबिया बहार संत्रा फळ पिक विमा मोठ्या प्रमाणात काढलेला होता.

हवामानातील बदलामुळे उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन हे मिळत नाही. फळपिक नुकसान भरपाई मिळण्यासाठी एक उपाय म्हणून पुनर्रचित हवामान आधारीत फळ पीक विमा योजनेमध्ये मोठ्या अपेक्षेने विमा काढून सुद्धा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पीक विमा मदत वेळेवर दिल्या जात नसल्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी शासनाला व विमा कंपनीला निवेदन देऊन केली आहे.

फळ पीक विमा मदत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी अनेक वेळा करून सुद्धा त्याला शासन व



विमा कंपनीचा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शासन व विमा कंपनीला धारेवर धरण्यासाठी, रिलायन्स इन्शुरन्स विमा कंपनीवर गुन्हे दाखल करण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांच्या नेतृत्वात हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या उपस्थितीत चक्काजाम आंदोलन करण्याचा करण्याचा इशारा शासन व रिलायन्स जनरल इन्शुरन्स विमा कंपनीला देण्यात आला.

निसर्गाची अवकृपा व शासनाचे दुर्लक्ष यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी डबघाईला आला आहे. यावर काही उपाययोजना करण्या ऐवजी किंवा संत्र्याला राजाश्रय देण्या ऐवजी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना संपविण्याचा घाटच शासनाकडून होतांना दिसत असल्याचे पुन्हा एकदा पुढे आले आहे.

८ महिन्यांचा कालावधी पूर्ण होत असताना देखील मोर्शी वरूड चांदुर बाजार तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काचे फळ पीक विम्याचे कोट्यावधी रुपये रिलायन्स इन्शुरन्स कंपनी वाटप करण्यास दिरंगाई केल्या जात असल्यामुळे शासनाची फळ पीक विमा योजना ही संत्रा उत्पादक शेतकर्यांच्या फायद्याची नसून विमा कंपनीच्या फायद्याची असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला आहे.

# दर्यापुरात ऑनलाईन फ्रॉड करणाऱ्या १२ जणांना अटक

## लॅपटॉप, मोबाइल, कार, सीमकार्ड, दोन दुचाकी जप्त, तीन महिन्यापासून होता भाड्याच्या खोलीत मुक्काम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ दर्यापूर–** मुंबईतील वरळी पोलिसांनी बुधवारी दर्यापुरातील एका घरातून ऑनलाईन फ्रॉड करणाऱ्या १२ जणांना अटक केल्याने संपूर्ण शहरात चांगलीच खळबड उडाली आहे. तिन्ही आरोपी दर्यापुरातील साईनगर भागातील सदानंद कॉलनीतील बंडू पवार यांच्या घरात गेल्या ३ महिन्यापासून भाडयाने राहत होते. आरोपींच्या ताब्यातून लॅपटॉप, मोबाइल, सीमकार्ड, कार, दोन दुचाकी जप्त केली असून मुंबई पोलिस सर्व आरोपींना ट्राजिंक रिमांडवर मुंबईला घेऊन जाणार आहे. माहितीनुसार, मुंबईतील वरळी पोलिसा ठाण्यात दोन महिन्यापूर्वी ऑनलाईन फ्रॉडचे अनेक गुन्हे दाखल झाले. त्यापैकी बहुतांश गुन्ह्यातील आरोपी जे लॅपटॉप वमोबाइल वापरत होते त्यांच्या आयपी ॲड्रेसचे लोकेशने मुंबई सायबर पोलिसांना अमरावती जिल्ह्यातील दर्यापुर



येथील साई नगर भागातील टॉवरचे मिळाले. गेल्या अनेक दिवसांपासून लोकेशन एकाच ठिकाणचे दिसत असल्याने मुंबई वरळी पोलिसांचे एक पथक १५ जानेवारी रोजी दर्यापुरात दाखल झाले. मुंबईपोलिसांनी दर्यापुर पोलिसांच्या मदतीने सदानंद कॉलनीतील बंडू पवार यांच्या घरातील पहिल्या माळ्यावर असलेल्या खोल्यांमध्ये राहणाऱ्या १२ आरोपींना अटक करून दर्यापुर पोलिस ठाण्यात त्यांची कसून चौकशी केली. त्यानंतर मुंबई पोलिसांनी दर्यापुर न्यायालयातून आरोपींचा ट्रान्जींक रिमांडरिमांड मिळवून त्यांन मुंबईला नेण्याची प्रक्रिया सुरू केली.

# बेल सावंगी, ऋषीबाबा, महादेव प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवा

## सिंचन विभागात अनिल बोंडेंची मॅरेथॉन बैठकशेकडो शेतकऱ्यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती :-** मोर्शी विधानसभा क्षेत्रात येणाऱ्या बेल सावंगी, ऋषी बाबा, महादेव प्रकल्प ग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या तातडीने सोडवून करून त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी राज्यसभा खासदार तथा भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी शेकडो शेतकऱ्यांना घेऊन जलसंधारण विभागाचे अधीक्षक अभियंता यांच्या दालनात बैठक घेतली. दरम्यान त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या प्रशासनाचे लक्षात आणून दिल्या.

मोर्शी विधानसभा क्षेत्रात बेल सावंगी धरण प्रकल्पासाठी पुसला येथील शेतकऱ्यांच्या जमिनीचे अधिग्रहण करणे व त्यांचा मोबदला त्यांना मिळावा, लोणी येथील ऋषी बाबा प्रकल्प येथील शेतकऱ्यांच्या जमिनीचे अधिग्रहण व त्या संदर्भातला मोबदला तसेच महादेव प्रकल्प सावंगा येथून ऋषीबाबा प्रकल्प लोणी येथे बंदिस्त पाईपद्वारे पाणीपुरवठा करणे संदर्भातल्या विविध बाबी डॉ.अनिल बोंडे



यांनी सिंचन विभागाचे अभियंता श्री.निपाणी यांना लक्षात आणून दिल्या. दरम्यान मोर्शी विधानसभा क्षेत्रातील शेतकरी व नागरिकांच्या तिन्ही प्रकल्पासंदर्भात असलेल्या प्रश्नांची तातडीने सोडवणूक करावी अशा स्पष्ट सूचना त्यांनी जलसंधारण विभागाचे अधीक्षक अभियंता श्री निपाणी यांना दिल्या. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी सुनील जाधव, पुसला येथील इंद्रभूषण सोंडे, रूपाली सोंडे, सदस्य माजी जिल्हा परिषद सदस्य गोपाल मालपे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष प्रवीण मानकर, ताराचंद फुटाणे, सुनील चिमोटे, प्रभाकर कपले, राजू बागडे, राजू नारनवरे, अरुण शिरभाते, पंकज मालपे, पिंटू मेंढे, संजय सावरकर, मयूर मालपे, सागर तिखे, संदीप क्षीरसागर, अतुल फुटाणे, श्रीकांत राऊत यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने बैठकीला उपस्थित होते.

# महावितरणच्या कारवाईत ३० लाखाची वीज चोरी उघड

## ५४ ग्राहकांनी मिटरमध्ये छेडछाड करून मीटर केले फॉल्टी

## दंडासहित वीजबिल न भरल्यास फौजदारी गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती–** अमरावती शहरात महावितरणने मागील पंधरा दिवसात केलेल्या कारवाईत ५४ वीज ग्राहकांनी मिटर मध्ये छेडछाड करून मीटर फॉल्टी केल्याचे प्रकार समोर आले आहे. १ लाख २१ हजार ४६० वीज युनिटच्या वीज चोरी पोटी महावितरणने या ग्राहकांवर २९ लाख ४० हजाराचा दंड ठोठावला आहे.

महावितरणचे संचालक संचलन श्री अरविंद भादीकर यांनी अमरावती येथे बैठ घेऊन वितरण हानी कमी करण्याचे सक्त निर्देश दिले होते.त्यानंतर अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात सर्वच विभागात वीज चोरी विरोधात मोहिम सुरू करण्यात आली आहे.

अमरावती शहरात उघड करण्यात आलेल्या ५४ वीज चोरांपैकी २७ वीज ग्राहकांनी १८ लाख ३४ हजाराची दंडात्मक रक्कम भरून आपली



सुटका करून घेतली आहे. उर्वरित २७ ग्राहकांवर कायदेशीर कारवाईची प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. यासोबतच अमरावती ग्रामीण विभाग ६५ ग्राहकांनी २२ लाखाची,मोर्शी विभागात ५३ ग्राहकांनी १२ लाखाची आणि अचलपूर विभागात ३८ लाखाच्या २०२ वीज चोऱ्या उघड करण्यात आल्या आहेत.

वीज मीटर मध्ये फेरफार अथवा छेडखानी करणे हा विद्युत विद्युत कायद्यानुसार गुन्हा असून या अंतर्गत संबंधित वीज ग्राहकावर कलम १३५ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.तसेच अशा ग्राहकांवर वीज चोरी करण्यात आलेल्या युनिटच्या दुप्पट रक्कम आकारण्यात येते.प्रति केडब्ल्यूएचपी नुसार औद्योगिक ग्राहकावर १० हजार रुपये,वाणिज्यिक ग्राहकावर ५ हजार रुपये तर इतर वर्गवारीतील ग्राहकावर २ हजार रुपये दंडात्मक कारवाई म्हणून तडजोडीचे शुल्क आकारण्यात येतो.वीज चोरीच्या गुन्ह्यात ३ वर्षापर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे.तसेच वीज मीटर मध्ये फेरफार करण्यासाठी प्रवृत्त व सहकार्य करणाऱ्या विरुद्ध विद्युत कायद्यातील कलम १५० नुसार गुन्हा दाखल करण्याची तरतूदही आहे.

# पेढी नदीवरील पुलाचे बांधकाम तत्काळ बंद करा

## बांधकाम विभागाच्या कार्यालयावर 'प्रहार'ची धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती –** वलगाव येथील पेढी नदीवरील पुलाचे बांधकाम करण्यात येत आहे. मात्र, हा पूल झाला तर नदीचे पाणी गावात जाऊन पूरस्थिती निर्माण होईल. त्यामुळे जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पुलाचे बांधकाम तत्काळ थांबविण्यात यावे. तसेच चांदूर बाजार रस्त्यावरील सती मंदिराजवळील सुकलेले मोठे वृक्ष आहे, ते



तत्काळ पाडण्यात यावे. अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग मुख्य कार्यकारी अभियंता यांना निवेदनातून केली आहे. वलगाव येथील पेढी नदीवर पुलाचे बांधकाम सुरू आहे. त्या बांधकामामुळे गावाला धोका निर्माण झाला आहे. नदीचे पाणी हे गावात शिरण्याची शक्यता आहे. त्यामुळे याकडे प्राधान्याने लक्ष देऊन ते काम तत्काळ थांबविण्यात यावे. तसेच वलगाव ते चांदूर बाजार रस्त्यावरील सती मंदिर परिसरात सर्वात मोठे सुकलेले झाड आहे. या झाडापासून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ते झाड पाडण्यात यावे. अशी मागणी प्रहारने निवेदनातून केली आहे. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा प्रमुख छोटू वसू महाराज, महानगर प्रमुख बंटी रामटेके, नंदू वानखडे, सचिन महल्ले, अभिजीत देशमुख, नितीन शिरभाते, प्रशांत शिरभाते, प्रफुल चहाकार, तेजस शिरभाते, इमरान शहा, अजय तायडे, कुणाल खंडारे आदी उपस्थित होते.

# एसएमएस कंपनीमधील दूषित पाण्याच्या प्रश्न प्रलंबितच

## आरोग्य विभाग अनभिज्ञ,अनेक जलस्त्रोतांमध्ये पाण्याचा शिरकावनांदगाव पेठ सह अनेक गावांना दूषित पाण्याचा विळखा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नांदगाव पेठ**

गोल्डन फायबर मधील दोनशे कामगारांना पिण्याच्या पाण्यातून विषबाधा झाल्याच्या प्रकरणात यंत्रणेने अद्याप कोणताही निष्कर्ष काढला नसून नेमके कशामुळे विषबाधा झाली हे गुलदस्त्यातच आहे.

मात्र कामगारांमध्ये भीतीचे वातावरण असून या प्रकरणाने एमआयडीसीसह आजूबाजूच्या गावांमध्येही पिण्याच्या पाण्याबाबत भीती बाळगल्या जात आहे. विशेष म्हणजे एमआयडीसीमधील कारखान्यांचे दूषित पाणी शुद्ध करण्याऱ्या एसएमएस प्रकल्पातील केमिकलयुक्त व विषाक्त पाण्याचा प्रश्न अजूनही प्रलंबीतच असल्यामुळे 'त्या' घटनेला एसएमएसचे दूषित पाणी सुद्धा कारणीभूत असू शकते असे अनेकांचे म्हणणे आहे. पंचतारांकित एमआयडीसीमधील एसएमएस कंपनीचे दूषित व विषाक्त पाणी नदीत व जलस्त्रोतांमध्ये शिरत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे.दरवर्षी पावसाळ्यात एसएमएस कंपनीचे दुषित पाणी नदीपात्रात तसेच पिण्याच्या पाण्याचे मुख्य जलस्त्रोतांमध्ये शिरते.या प्रकारामुळे नांदगाव पेठ मधील नागरिकांना दूषित आणि विषाक्त पाण्याचा सामना करावा लागतो.शिवाय नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. अनेक वेळा तक्रारी करून देखील एसएमएस कंपनीच्या

### एसएमएस कंपनीवर कार्यवाही का नाही?

अनेक वर्षांपासून एसएमएस कंपनी पंचतारांकित एमआयडीसी मध्ये कार्यरत असून ती एका वरिष्ठ भाजप नेत्याची कंपनी असल्यामुळे अधिकारी वर्ग त्या कंपनीवर कार्यवाही करण्याचे धाडस करत नाही.खा. अनिल बोंडे कृषिमंत्री असतांना त्यांच्या शेतातील विहिरीत देखील एसएमएस कंपनीचे विषाक्त पाणी शिरले होते.अनिल बोंडे यांनी मिडीयामध्ये हे प्रकरण चांगलेच तापवले होते मात्र नंतर पाणी कुठे मुरले हे कळलेच नाही.आद्यपही या कंपनीवर कोणत्याही प्रकारची ठोस कार्यवाही झाली नाही हे विशेष!



व्यवस्थापनाने याबाबत कोणत्याही उपाययोजना केल्या नाहीत तर जिल्हा प्रशासनाने देखील नागरिकांच्या तक्रारींना केराची टोपली दाखवली. एसएमएस कंपनीमधील केमिकलयुक्त व विषाक्त पाणी जमिनीमध्ये मुरवले जाते. त्याठिकाणी निलगिरीचे अनेक वृक्ष असल्याने ते वृक्ष विषाक्त पाणी शोषून घेते मात्र उर्वरित पाण्याचा जमिनीमध्ये व पाण्याच्या इतर जलस्त्रोतांमध्ये शिरकाव होत असल्याने ते पाणी नळाच्या माध्यमातून नांदगाव पेठ व आजूबाजूच्या गावातील नागरिकांच्या घरात शिरत आहे.या पाण्यामुळे अनेक दुर्धर आजार होण्याची शक्यता असून आरोग्य विभागाने तसेच एमआयडीसीने या गंभीर प्रकाराकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे.गोल्डन फायबर मधील तो प्रकार सुद्धा याच दूषित पाण्यामुळे झाला असावा असा कयास लावल्या जात आहे मात्र अद्यापही अहवाल न आल्याने कामगारांना नेमके कशामुळे विषबाधा झाली हे अद्याप सांगणे कठीण आहे. चौकट

### साथीच्या आजारात वाढ

एसएमएस कंपनीमधील विषाक्त पाण्यामुळे नांदगाव पेठ मधील अनेक परिसरात साथीच्या आजारात वाढ झाली आहे. पोटदुखी, उलट्या, मळमळ होत असल्याने अनेक रुग्ण शासकीय व खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. लहान बालकांमध्ये हे प्रमाण जास्त असून नांदगाव पेठ मधील सर्वच जलस्त्रोतांचे नमुने तपासणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

# चिखलदऱ्यात कुपोषण, बालमृत्यू, रोजगारावर खल

## गाभा समितीची बैठक : अधिकाऱ्यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ चिखलदरा**

मेळघाटमधील कुपोषण, बालमृत्यू, रोजगार, आरोग्यसेवा तसेच मूलभूत सुविधांच्या मुद्द्यांवर बुधवारी (ता. १५) चिखलदरा येथे प्रशासनाकडून गाभा समितीच्या बैठकीत आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.



बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, बांधकाम विभागाचे व कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकळे, सहायक गटविकास अधिकारी जीवनलाला भिलावेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी अधिकाऱ्यांनी मोथा गावाला भेट देत तेथील स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा केली. मेळघाटातील रबडी सुप्रसिद्ध असून पर्यटकांपर्यंत दर्जेदार रबडी पोहोचावी, यासाठी नियोजन करण्यात आले. याशिवाय स्थानिक ग्रामस्थ विशेषतः महिलांकडून उत्पादित होणाऱ्या साहित्याची विक्री करण्यासाठी त्यांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्याकरिता उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी सीईओंनी अधिकाऱ्यांना दिले.

# मुदतवाढीनंतरही सोयाबीनचे दर दबावातच; खुल्या बाजारात क्विंटलला मिळतोय सरासरी ४१०० रुपये भाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

हमीदराने शासकीय खरेदीस मुदतवाढ दिली असली तरी नोंदणीकृत शेतकऱ्यांनाच त्याचा लाभ मिळणार आहे. उर्वरित शेतकऱ्यांना खासगी बाजारातच पडत्या दराने विक्री करण्याची वेळ आली असून मुदतवाढीनंतरही या बाजारातील दर वधारू शकले नाहीत. बुधवारी स्थानिक बाजार समितीत सरासरी ४१०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी झाली.

राज्यात बारदान्याअभावी ठप्प झालेली सोयाबीन खरेदीची मुदत १२ जानेवारी रोजी संपल्यानंतर पुन्हा एकदा केंद्र सरकारने ३१ जानेवारीपर्यंत खरेदीस मुदतवाढ दिली. तरीही स्थानिक बाजारात सोयाबीनच्या दरात घसरण सुरूच आहे.बुधवारी (ता.१५) अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत ७ हजार ७७ क्विंटल सोयाबीनची आवक झाली. किमान ४ हजार, तर कमाल ४ हजार २१३ रुपये म्हणजे सरासरी ४ हजार १०६ रुपये प्रति क्विंटल दर मिळाला.गेल्या ११ जानेवारीला ७ हजार ५३९ क्विंटल आवक होऊन किमान ३ हजार ९५०, कमाल ४ हजार २१२ म्हणजे सरासरी ४ हजार ८१ रुपये प्रति क्विंटल दर मिळाला होता. गेल्या तीन ते चार दिवसांत सोयाबीनच्या दरात केवळ २५ रुपयांची वाढ झाली आहे. विदर्भातील इतर बाजार समित्यांमध्ये हीच परिस्थिती असून अनेक ठिकाणी सोयाबीनचे सरासरी खरेदी दर हे चार हजारपेक्षा कमी आहेत.



यंदाच्या हंगामात सोयाबीनचे उत्पादन चांगले झाले असले तरी खुल्या बाजारात साडेतीन ते चार हजार रुपये दर मिळत असल्याने हमीभावाने खरेदी करावी, यासाठी शेतकरी आग्रही आहेत. मात्र, 'नाफेड'ने १२ टक्के ओलाव्याची अट घातल्याने आत्तापर्यंत नोंदणी केलेल्या सात लाख ४९ हजार शेतकऱ्यांपैकी केवळ दोन लाख ५ हजार ५३९ शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी केले आहे.राज्यात १४ लाख १३ हजार २७० मेट्रिक टन खरेदीचे लक्ष्यांक निश्चित करणाऱ्या राज्य सरकारने १५ ऑक्टोबर ते १२ जानेवारी या तीन महिन्यांच्या कालावधीत राज्यात ३ लाख १० हजार १६१ मेट्रिक टन सोयाबीनची खरेदी केली आहे. अमरावती जिल्ह्याचा त्यामध्ये वाटा २१० मेट्रिक टन आहे.

जिल्ह्यात सहा जानेवारी या मुदतवाढीच्या टप्प्यावर १९ हजार ८०१ शेतकऱ्यांनी नोंदणी केली. त्यापैकी १० हजार २६८ शेतकऱ्यांचा २ लाख १० हजार ५९५ क्विंटल सोयाबीन खरेदी झाला आहे. उर्वरित ९ हजार ५३३ शेतकऱ्यांना मुदतवाढीचा लाभ मिळणार आहे. तर उर्वरित शेतकऱ्यांना खुल्या बाजाराशिवाय पर्याय राहिलेला नाही. सोयाचीनला ४ हजार ८९२ रुपये प्रति क्विंटल हमीदर आहे, तर खुल्या बाजारात सरासरी ४१०० रुपये दर आहेत.

# इतवारा बाजारातील रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

## अतिक्रमणावर महापालिकेचा हातोडा; साहित्य केले जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती शहरातील गजबजलेल्या संवेदनशील इतवारा बाजारातील अतिक्रमणावर महापालिकेच्या पथकाने हातोडा मारत साफ केले. यामुळे ज्या भागात चालायलाही वाट नव्हती ते रस्ते मोकळे झालेत. विशेषतः भाजी बाजारातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला. तथापि ही मोकळी बाट किती काळ टिकते, हा प्रश्न अधांतरी आहे.

महापालिकेच्या अतिक्रमण पथकाने सकाळपासूनच इतवारा बाजारातील अतिक्रमणाविरुद्ध मोहीम सुरू केली. बाजारातील व्यावसायिकांनी ओट्याच्या पुढ्यातही साहित्य ठेवल्याने ग्राहकांसाठीचा मार्ग अवरुद्ध झाला होता, तर चित्रा चौक ते इतवारा बाजार या मार्गावरील दोन्ही बाजूकडील व्यावसायिकांनी फुटपाथवरही साहित्य ठेवल्याने वाहतुकीसाठीचा मार्ग अवरुद्ध झाला होता. मनपाच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने राबविलेल्या मोहिमेत पक्के अतिक्रमण तोडून टाकले व अतिक्रमित साहित्य, गाड्या व इतर साहित्य जप्त केले. यामुळे रस्ते व फुटपाथ मोकळे झाले असून वाहतुकीस निर्माण झालेला अडथळा दूर झाला आहे.इतवारा बाजारातील अतिक्रमण निर्मूलनाची मोहीम यापूर्वीही तत्कालीन उपायुक्त माधुरी मडावी यांच्या नेतृत्वात राबविण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा अतिक्रमण जैसे थे झाल्याने बुधवारी राबविण्यात आलेली मोहीम किती यशस्वी होते, हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# विदर्भात अवकाळी पावसाची शक्यता! किमान तापमानात वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नागपूर**

राज्यातील अधिकांश भागात थंडीचा जोर हळूहळू ओसरू लागला आहे. विदर्भातदेखील किमान तापमानात चढउतार होत आहे. थंडी जाणवत असली तरीही गेल्या काही दिवसांपासून किमान तापमान दहा अंश सेल्सिअसपेक्षा अधिकच आहे.



उत्तरेकडील थंड वाऱ्यांच्या प्रवाहाचा परिणाम म्हणून एकीकडे राज्यात पहाटे गारवा आणि धुक्याची चादर दिसून येत आहे. तर दुसरीकडे किमान तापमानात वाढ झाली असून ढगाळ हवामानामुळे हलक्या पावसाची हजेरी राहणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. सध्या चक्राकार वाऱ्यांची स्थिती पंजाब आणि त्याला जोडून पाकिस्तानच्या परिसरात आहे त्यामुळे उत्तरेकडील राज्यांमध्ये पावसाला पोषक वातावरण आहे. तर दक्षिणेतही जोरदार पावसासह वादळी वाऱ्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्याचा परिणाम महाराष्ट्राच्या हवामानावरदेखील होत आहे.

गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील अनेक भागात ढगाळ वातावरण आहे. तर येत्या २४ तासात किमान तापमानात पुन्हा एकदा वाढ होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पश्चिम हिमालयीन भागात नव्याने पश्चिमी चक्रावात तयार झाला असून पुढील चार दिवस हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, राजस्थान, पंजाबसह महाराष्ट्रात विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उर्वरित महाराष्ट्रात हवामान कोरडे राहणार असून तापमानात काहीशी वाढ होण्याचा अंदाज आहे.

राज्यात गेल्या दोन दिवसांपासून किमान तापमान कमी झाले आहे, तर विदर्भात किमान तापमानात चढउतार दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने चढउतार होत असून अवकाळी पावसाला पोषक हवामान तयार झाल्याने शेतकरी धास्तावले होते. हवामान खात्यानेदेखील महाराष्ट्रातील विदर्भात पावसाचा इशारा दिला होता. वातावरणात उकाडाही जाणवत होता, तर मध्येच थंडीसुद्धा जाणवत होती. पहाटे हलका गारवा आणि धुकेही होते.

राज्यात मध्य महाराष्ट्रात बहुतांश भागात किमान तापमान सामान्य तापमानाच्या तुलनेत अधिक नोंदवले जात आहे. पुणे, नाशिक, मुंबई भागात पारा १५ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक आहे. तर मराठवाड्यातदेखील किमान तापमान २० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक आहे. येत्या २४ तासात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. साधारण दोन अंश सेल्सिअसने किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. तर विदर्भात वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यतादेखील आहे.

# शिंदे गटाच्या शहराध्यक्षाविरुद्ध गुन्हा
# नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

रेल्वे विभागात नोकरी लावून देतो, असे आमिष देऊन १७ तरुणांकडून तब्बल १ कोटी ५६ लाख रुपये हडपल्याची तक्रार अंजनगाव पोलिसांत फसवणूक झालेल्या तरुणाने केली. या तक्रारीवरुन पोलिसांनी चार जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. त्यात शिवसेना शिंदे गटाचा अंजनगाव सुर्जी शहराध्यक्ष योगेश उर्फ मुन्ना इसोकार याचा समावेश आहे.

या प्रकरणात मंगेश हेंड (३८, रा. रामटेकपुरा, अकोट) यांनी पोलिसांत तक्रार दिली होती. त्याआधारे पोलिसांनी योगेश उर्फ मुन्ना इसोकार (रा. अंजनगाव सुर्जी), श्रीकांत फुलसावंदे (रा. राजुरा ता.जि अमरावती), विलास जाधव (रा. परतवाडा) आणि मॉन्टी उर्फ मेघराजसिंह चव्हाण ठाकूर (रा. मसानगंज अमरावती) या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंगेश हेंड यांची डिसेंबर २०२१ मध्ये अंजनगाव सुर्जी येथील शिवसेना शिंदे गटाचा शहराध्यक्ष योगेश उर्फ मुन्ना इसोकारसोबत ओळख झाली. त्यावेळी मुन्ना इसोकारने मंगेश यांना सांगितले की, मी शिवसेनेतील एका माजी आमदारासोबत तुमची ओळख करुन देतो. त्याच माध्यमातून तुम्हाला रेल्वे विभागात नोकरीवर लावून देतो. त्यासाठी मात्र तुला पैसे खर्च करावे लागतील. तसेच दहा ते पंधरा उमेदवार लागतील. प्रत्येकाला नोकरीसाठी दहा लाख रुपये खर्च येणार असून, तो तुम्हाला करावा लागेल. इसोकारच्या या बतावणीमुळे मंगेश हेड यांनी अकोट येथील त्यांचे काही नातेवाईक व मित्र परिवारातील तरुणांना याबाबत सांगितले. त्यानंतर मंगेश हेंड यांचा मुन्ना इसोकार यांच्यासोबत व्यवहार सुरू झाला. त्यानंतर इसोकार यांच्या सांगण्यावरुन श्रीकांत फुलसावंदे यांच्यासोबत संपर्क साधून काही रक्कम त्याच्याकडे देण्यात आली. तसेच नागपुरातील एका बँकेत 'आरटीजीएस'द्वारे रक्कम जमा केली. त्यानंतर सर्व उमेदवारांना मुंबईतील भायखळा येथील सेंट्रल रेल्वे हॉस्पिटल येथे बोलावून उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तुमची लवकरच रेल्वे अधिकाऱ्यांसोबत अंजनगाव सुर्जी येथे भेट घालून देणार असल्याचे त्यांना सांगण्यात आले.

रक्कम दिल्यानंतर आरोपींनी उमेदवारांना सांगितले की, तुम्हाला परीक्षा देण्याची गरज नाही, आम्ही तुमची 'ऑर्डर' काढतो. सर्वांना आपआपल्या पत्त्यावर 'जॉइनिंग लेटर' मिळेल. त्यानंतर सर्व उमेदवार मुंबई येथे रूजू होण्यासाठी गेले असता तेथे अधिकारी हजर नाही, असे सांगून टाळाटाळ करून जे अधिकारी रूजू करून घेणार आहेत, ते सुद्धा सुटीवर गेले आहेत. ते सुटीवरून परत आल्यानंतर तुम्हाला रूजू करण्यात येईल, असे सांगितले. त्यानंतर मुन्ना इसोकारसोबत उमेदवारांनी संपर्क केला असता त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली असल्याचेही तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर! मोदी सरकारची आठव्या वेतन आयोगाला मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी देण्यात आली आहे. दरम्यान या आठव्या वेतन आयोगामुळे १.२ कोटींहून अधिक केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांच्या वेतन आणि निवृत्तीवेतनामध्ये सुधारणा होणार आहे.

यावाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी, आठव्या वेतन आयोगाच्या शिफारशी पुढील वर्षी सादर केल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सातव्या वेतन आयोगाची मुदत ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपत असल्याने केंद्रीय सरकारी



कर्मचारी या संदर्भातील घोषणा होण्याची आतुरतेने वाट पाहत होते.

नव्या वेतन आयोगाच्या स्थापनेबाबत गेल्या एका वर्षभरात कर्मचारी प्रतिनिधी आणि विविध कामगार संघटनांनी सरकारसोबत अनेक बैठका घेतल्या आहेत. अर्थसंकल्पपूर्व बैठकीचा भाग म्हणून संघटनांनी अलीकडेच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेत, सुमारे ५० लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि ६७ लाख निवत्तीवेतनधारकांसाठी आठवा वेतन आयोग स्थापन करण्याची मागणी केली होती.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही घोषणा करताना, २०२६ पर्यंत आठव्या वेतन आयोगाची स्थापना होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यांनी पुढे सांगितले की, सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी आधीच लागू करण्यात आल्या आहेत. सरकार नंतर आयोगाच्या सदस्यांसह इतर तपशीलांची माहिती देईल.

सातव्या वेतन आयोगाद्वारे केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन रचनेत, भत्त्यात आणि निवृत्तीवेतनात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. ज्यामुळे वेतन समानता आणि कर्मचारी व निवृत्त निवृत्तीवेतनधारक दोघांनाही त्याचा फायदा झाला. यानंतर, आता सर्व केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांचे लक्ष ८ व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या संभाव्य अंमलबजावणीकडे लागले आहे.

# विद्यापीठात कॅम्पसची जैवविविधता (वनस्पती व प्राणी) कॅटलॉग वर २८ जानेवारी रोजी कार्यशाळेचे आयोजन

## एन.ई.पी. आधारित कौशल्य अभिमुक्ता कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन आणि विद्यापीठातील वनस्पती व प्राणी समिती यांचे संयुक्त विद्यमाने 'कॅम्पसची जैवविविधता (वनस्पती व प्राणी) कॅटलॉग' या विषयावर दि. २८ जानेवारी, २०२५ रोजी दृकश्राव्य सभागृह याठिकाणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व सल्लागार समितीचे सदस्य डॉ.ए.बी. मराठे यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४५० एकर परिसरामध्ये नैसर्गिक वनस्पती व प्राण्यांचा समृद्ध आणि वैविद्धपूर्ण वावर आहे. कॅम्पसमध्ये वनस्पती, प्राणी, जिवाणू, बुरशी आणि इतर जीव सृष्टीसह विविध सजीवांची जैवविविधता असून उंच झाडांपासून ते सूक्ष्म झाडे व वनस्पती सुद्धा आहेत. कॅम्पसमधील जैवविविधतेचे संवर्धन करणे, देखभाल आणि योग्य मूल्यमापन करणे, आदींच्या अनुषंगाने ही कार्यशाळा लक्ष केंद्रीत करीत आहे. वनस्पती ओळख, प्राणी ओळख, जी.पी.एस. टॅग केलेली छायाचित्रणे या क्षेत्रातील फिल्डवर्कवर



कार्यशाळेत लक्ष केंद्रीत होणार आहे.

सकाळी ११ वाजता नोंदणी, दु. १२ ते १२.३० उद्धाटन कार्यक्रम, त्यानंतर 'इकॉलॉजिकल इम्पॉर्टन्स ऑफ फ्लोरा ॲन्ड फौना अन्ड देअर सिग्निफिकन्स टू इकोसिस्टीम डायनामिक्स' यावर वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार, 'कलेक्शन, आयडेन्टिफिकेशन ॲन्ड प्रिपरेशन ऑफ प्लांट हर्बेरियम' यावर डॉ. प्रशांत गावंडे, 'मशरुम कलेक्शन ॲन्ड आयडेन्टिफिकेशन' यावर महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, वरुडचे प्राचार्य डॉ. दिलीप हांडे, 'अंडरस्टॅन्डग ॲन्ड प्रोटेरक्टग द ॲनिमल लाईफ ऑन युनिव्हर्सिटी कॅम्पस' यावर जैवविविधता तज्ज्ञ डॉ. जयंत वडतकर व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे डॉ. गजानन वाघ, 'असेसमेंट ऑफ मेडिसिनल व्हॅल्यू इन प्लांट्स कन्क्लुयुडिंग रिमार्कस' यावर डॉ. अनिता पाटील माहिती देतील.

विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहामध्ये आयोजित कार्यशाळेकरीता नोंदणी शुल्क रू. १००/- ठेवण्यात आलेले आहे. वनस्पती व प्राणी समितीच्या निर्देशिका सल्लागार मंडळामध्ये जीवतंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर, माजी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ.जे.ए. तिडके व डॉ.एस.आर. माणिक यांचा समावेश असून जीवतंत्रशास्त्र विभागातील वरीष्ठ प्राध्यापक डॉ. अनिता पाटील, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार व प्रशांत गावंडे हे या परिषदेचे आयोजक आहेत. याकरीता समिती गठीत करण्यात आली आहे. अधिक माहितीकरीता डॉ. अनिता पाटील यांचेशी दूरध्वनी क्र. ९८८१७३५३५४ यावर संपर्क साधता येईल. कार्यशाळेकरीता ज्यांना सहभागी व्हावयाचे असेल त्यांना https://forms.gle/p-8BPaZJLdtGznJf- या लिंक्वरून नोंदणी करता येईल.

# काँग्रेसचा आता 'जय बापू, जय भीम, जय संविधान' चा नारा; देशव्यापी मोहीम राबवणार

## २६ जानेवारीला मोहिमेचा होणार प्रारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

देशातील सार्वत्रिक निवडणुकांमध्ये सातत्याने पराभवाचा सामना करणाऱ्या काँग्रेस आता 'जय बापू, जय भीम जय संविधान' असा नारा देत देशव्यापी जनसंपर्क मोहिम राबवणार आहे. येत्या २६ जानेवारीला पक्षाच्या वतीने 'संविधान वाचवा' या राष्ट्रीय पदयात्रा मोहिमेचा प्रारंभ होणार असून पुढे वर्षभर ती सुरू राहील. यात कार्यकर्त्यांच्या माध्यमातून देशातील प्रत्येक घराघरात संपर्क साधण्यात येणार आहे. राज्यघटनेनुसार देशाचे कामकाज चालणे का महत्वाचे आहे हे यातून जनतेसमोर नेण्यात येईल.


अखिल भारतीयकाँग्रेस समितीने हा कार्यक्रम तयार केला आहे. काँग्रेसच्या बेळगावात होणाऱ्या विस्तारीत कार्यकारिणीच्या बैठकीतच याची घोषणा करण्यात येणार होती, मात्र त्यावेळी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचे अचानक निधन झाल्यामुळे तो कार्यक्रम रद्द झाला. 'जय बापू, जय भीम जय संविधान' या कार्यक्रमासाठी काँग्रेसने मध्यप्रदेशातील महू येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरची निवड केली आहे. या दिवशी देशाच्या प्रत्येक शहर, जिल्हा, तालुका तसेच गावस्तरावरील शाखांच्या वतीने पक्ष कार्यालयात ध्वजारोहण कार्यक्रमांचे आयोजन करून परिसरामध्ये पदयात्रा काढण्यात येईल.

याच दिवसापासून पुढे वर्षभर संविधान वाचवा राष्ट्रीय पदयात्रा मोहिम राबवण्यात येणार आहे. पक्षाचा जनतेतील पाया भक्कम करणे, त्यासाठी घरोघर जाऊन मतदारांबरोबर संपर्क साधणे, त्यांना पक्षाची धोरणे, स्वातंत्र्य चळवळीतील योगदान याची माहिती देणे व प्रामुख्याने देशासाठी राज्यघटना किती व का महत्वाची आहे यासंबधीची जागृती करणे असा कार्यक्रम यात पक्ष कार्यकर्त्यांसाठी देण्यात आला आहे. त्याचबरोबर केंद्रीय गृहमंत्री यांनी ससंदेतील भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा केलेला अवमान हाही मुद्दा यात घेण्यात येणार आहे.

या मोहिमेत अन्य काही कार्यक्रमांचाही समावेश करण्यात येणार आहे. पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी सक्रिय रहावेत, त्यांच्यासमोर काही उद्दीष्ट असावे यासाठी म्हणून ही वर्षभराची मोहिम आखण्यात आली आहे. यातून कार्यकर्ता प्रशिक्षित होण्याबरोबरच जनतेमध्येही देशाची राज्यघटना, राज्यकारभार, वर्तमान तसेच भविष्यातील धोके याबाबत जागरूकता यावी या दृष्टिने यातील कार्यक्रमाची रचना करण्यात आली आहे. अन्य तपशील पक्षाच्या वतीने नंतर कळवण्यात येतील असेही जिल्हाध्यक्ष व अन्य पदाधिकाऱ्यांना यासंबधी पाठवण्यात आलेल्या पत्रात नमुद करण्यात आले आहे.

# तिरुपती दर्शनास जायचंय... मग एप्रिलपर्यंत थांबाच!

## मार्च पर्यंतचे बुकिंग झाले फुल्ल



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

प्रत्येक महिन्यात जिल्ह्यातील दर्शनासाठी जातात. मार्चनंतर तिरुपतीला जाण्याचे अनेकांकडून नियोजन सुरु आहे. सध्या मार्चपर्यंतची ऑनलाइन दर्शन बुकिंग - संपली. एप्रिलचा दर्शन कोटा सोमवारी (दि.२०) खुला - होणार आहे. त्यामुळे तिरुपतीला जायचं असेल तर एप्रिलपर्यंत थांबा म्हणण्याची वेळ आली आहे. भगवान श्री बालाजींच्या दर्शनासाठी देशभरातून रोज ७ लाखो भाविक तिरुपतीत येतात. भाविकांना ऑनलाइन तसेच ऑफलाइन पद्धतीने दर्शन पास मिळवता येतो. ज्यांना ऑनलाइन तिकीट मिळत नाही अशांना जाऊन ऑफलाइन तिकिट मिळवणे खूप अवघड असते.

रात्री बारानंतर रांगेत उभे राहावे लागते. तिथे खूप मोठी गर्दी असते. चेंगराचेंगरी होण्याची भीती भाविकांना असल्याने बहुतांश ऑनलाइनच तिकीट दर्शनासाठी भाविक दर्शन काढतात.भाविकांची झुंबड उडू नये, यासाठी तिरुमला तिरुपती देवस्थानकडून रोज वीस ते पंचवीस हजार भाविकांना ऑनलाइन दर्शन तिकिटांचे वाटप होते.

### एकाच वेळी सुरू होते बुकिंग सेवा

तिरूपती येथे साधारण तीन महिने अगोल ऑनलाइन दर्शन पास भाविकांना दिले जातात. दर्शन तिकीट मिळाल्यानंतर निवासाची सोय केली जाते. त्याशिवाय तेथे रूम बुक करता येत नाही. त्यामुळे रोज अनेक भाविक आमच्याकडे येतात. तिकीट काढण्याची सूचना करतात. देशभरात एकाच वेळ ऑनलाइन बुकिंग सेवा सुरू होते, त्यामुळे देशभरातील भाविक तिकीट वेबसाइटवर तुटून पडतात त्यामुळे मोजक्याच भाविकांना तिकीट मिळते. काही भाविकांना पाच ते सहा महिने सुद्धा तिकीट मिळत नाही अशी स्थिती असते.

# खेळाडूंना ऑनलाइन सवलत गुण मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

दरवर्षी दहावी व बारावीच्या खेळाडू विद्यार्थ्यांना सवलत गुण मिळविण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे ऑफलाइन पद्धतीने अर्ज करावा लागत असे. परंतु यावर्षीपासून खेळाडूंना शासनाच्या आपले सरकार पोर्टल द्वारे ग्रेस गुणांची मागणी करावी लागणार आहे.



यापूर्वी खेळाडू विद्यार्थ्यांना जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून ऑफलाइन पद्धतीने अर्ज मागविले जात होते. त्या माहितीचे संकलन करून कार्यालयाद्वारे हे गुण माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत मंडळाकडे पाठवले जात होते. पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाइन प्रणालीद्वारे सादर करण्याची सुविधा दिलेली आहे.सवलत गुण प्रक्रिया काही मानवी उणीवांमुळे काही विद्यार्थ्यांना ग्रेस गुणांपासून वंचित रहावे लागत असे. यावर तोडगा व सवलत गुण प्रक्रिया निर्दोष केली आहे.

# अर्धाअधिक कापूस आला घरात तर काही शेतातच

## दरवाढीच्या प्रतीक्षेत कापूस उत्पादकांची होताहेत आर्थिक कोंडी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

केंद्र शासनाने कापसाचे हमीभाव जाहीर केले. मात्र, त्यापेक्षाही जास्त खर्च कापसाला आला आहे. सीसीआयकडून मिळणारा दर परवडणारा नसल्याने अमरावती जिल्ह्यातील निम्म्यापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी कापूस राखून ठेवला आहे. तर काहींचा कापूस मजुरांअभावी शेतातच डोलत आहे. आतापर्यंत कापसाची जेवढी खरेदी करण्यात आली त्यापेक्षा निम्मा कापूस शेतकऱ्यांच्या घरात आहे.

या शेतकऱ्यांना कापसाच्या दरवाढीची प्रतीक्षा आहे. ज्या शेतकऱ्यांनी कापूस विकण्याची तयारी दर्शविली त्यांचा कल सीसीआयकडे वाढला आहे. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी हा कापूस मिळेल त्या भावात विक्री करण्यास सुरुवात केली आहे. यातून आतापर्यंत सीसीआयने कापसाची फारच कमी खरेदी केली आहे. सीसीआयच्या तुलनेत व्यापाऱ्यांनी अधिक खरेदी केली आहे. यामुळे शेतकऱ्यांना अधिकच तोटा सहन करावा लागला आहे.

### मजूर मिळेना, कापूस शेतात पहाटीला लोंबकळत

सद्यस्थितीत बहुतांश १ शेतकऱ्यांच्या शेतातील कापूस वेचणीचा हंगाम अंतिम टप्प्यात आला असल्याचे दिसून येत आहे.महत्त्वाचे म्हणजे गेल्या चार-पाच दिवसांपासून आकाशात ढगांची गर्दी असल्याने पावसाची शक्यता आहे.जिल्ह्यातील काही ठिकाणी ३ पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे कापूस उत्पादक धास्तावले असून कापूस वेचणी करण्यासाठी शेतकरी मजुरांची मनधरणी करीत आहे.

### पुढे कापसाची आवक वाढण्याची शक्यता !

कर्जाची परतफेड आणि संपूर्ण वर्षभराचे नियोजन करण्यासाठी शेतकरी दरवर्षी जानेवारी ते मार्च महिन्यात कापसाची विक्री करतात. एकाचवेळी सर्व कापूस विकण्याच्या मानसिकतेत शेतकरी असतात. दर वाढले तर शेतकऱ्यांचे नुकसानच होते. अनेकदा कापूस विकल्यावर दर वाढतात. यातून अलिकडे फेब्रुवारी आणि मार्चमध्ये मोठ्या प्रमाणात कापूस विक्रीचे प्रमाण वाढले आहे. याचवेळी हा कापूस बाजारात येण्याचा अंदाज असल्याने या दिवसात आवक वाढणार आहे.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये क्रीडा सप्ताहाचा जल्लोषात प्रारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये क्रीडा सप्ताहाचा भव्य प्रारंभ मोठ्या जल्लोषात करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी समूहातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक मार्चपास्ट आणि प्रात्यक्षिकांनी झाली. विद्यार्थ्यांनी दाखवलेला उत्साह आणि शिस्तबद्धता पाहून उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले.क्रीडा सप्ताहात विद्यार्थ्यांसाठी विविध मैदानी आणि इनडोअर खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये क्रिकेट, कबड्डी, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बास्केटबॉल, टेबल टेनिस, कॅरम आणि बुद्धिबळ यांसारखे खेळ सहभागी आहेत.पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया यांनी उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, क्रीडा ही केवळ आरोग्यासाठी महत्त्वाची नाही, तर ती व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन आहे. खेळांमुळे सहकार्य, नेतृत्वगुण, आणि संघभावनेचा विकास होतो. कार्यक्रमात पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे स्पोर्ट शिक्षक प्रा. संदीप ठाकरे आणि प्रा. सुयोग तायडे यांनी विद्यार्थ्यांना खेळांशी संबंधित नियमांचे महत्त्व पटवून देत त्यांचे मनोबल वाढविले.या क्रीडा सप्ताहाचे प्रमुख उपस्थित मान्यवरांमध्ये आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एल. भुतडा, फार्मसी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. डी. बी. रुईकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे, नर्सिंग महाविद्यालयाचे प्रा. सुज्ञान गवई, बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. देशमुख, आर्किटेक्चर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डब्ल्यू. देशमुख, तसेच उपप्राचार्य डॉ. मो. झुहेर, आणि स्टुडंट वेल्फेअर डीन डॉ. एस. के. नंदा यांचा समावेश होता.सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या मोठ्या उपस्थितीत कार्यक्रम यशस्वी झाला. क्रीडा सप्ताहाच्या समारोपादिवशी विजेत्यांना सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.विद्यार्थ्यांचा प्रचंड उत्साह पाहता, हा क्रीडा सप्ताह प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# उद्योगपती मोदींकडून त्र्यंबकेश्वर मंदिरात सव्वा किलो सोनं अर्पण; सोन्याचा मुकुट बनवणार अंदाजे किंमत किती?

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १६ नाशिक**




धार्मिक भक्ती आणि श्रद्धेतून देवाच्या दरबारात माथा टेकण्यासाठी कोट्यवधी भाविक दररोज जात असतात. त्यातच, नवीन वर्षाच्या पहिल्या दिवसाची सुरुवात करण्यासाठी देखील भाविकांची तीर्थक्षेत्रस्थळी मोठी गर्दी झाल्याचं पाहायला मिळालं. यावेळी, शिर्डी साईबाबा, नाशिक त्र्यंबकेश्वरसह राज्यातील अनेक मंदिरात भाविकांना मोठ्या संख्येनं दान केलं. कुणी रोकड स्वरुपात, कुणी सोनं-चांदीच्या दागिने स्वरुपात, कुणी ऑनलाईन पद्धतीने दान देऊन देवाप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली. महाराष्ट्रातील पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या नाशिक त्र्यंबकेश्वर मंदिरास काही दिवसांपूर्वी रिलायन्स इंडस्ट्रीजचे व्हाईस चेअरमन आणि उद्योगपती मुकेश अंबानी यांचे निकटवर्तीय असलेल्या मनोज मोदी यांनी भेट दिली होती. त्यावेळी, त्र्यंबकेश्वर मंदिरातील सोन्याचा मुकुट बनविण्यासाठी सोनं देण्याचं त्यांनी म्हटलं होतं.

मनोज मोदी यांनी भेट दिल्यानंतर म्हटल्याप्रमाणे त्र्यंबकेश्वर देवस्थानला सव्वा किलोचे सोने दान केले आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजचे व्हाईस चेअरमन मनोज मोदी मागील महिन्यात दर्शनासाठी आले होते, त्यावेळी देवस्थानच्या विश्वस्तांनी २०० वर्षांपूर्वीचा सुवर्ण मुकुट नव्याने बनविण्याचा संकल्प त्यांना सांगितला होता. देशभरातील भक्तांच्या सुवर्ण दानातून साडेआठ किलोचा सुवर्ण मुकुट बनविला जाणार आहे.

# गृहमंत्रीपद सांभाळण्यात फडणवीस अपयशी

## सैफवरील हल्ल्यानंतर काँग्रेसचा संताप

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १६ मुंबई**


पद्मश्री पुरस्काराने सन्मानीत सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेता सैफ अली खान यांच्यावर झालेला खुनी हल्ला महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारा आहे. मुंबईतील वांद्रे या वर्दळीच्या भागात अशा घटना होत असतील तर मुंबईत कोण सुरक्षित आहे? मुंबई, पुणे, बीड, परभणी, नागपूरमधील वाढत्या गुन्हेगारी घटना पाहता राज्यात गृहमंत्री आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. भाजपा युती सरकारमध्ये गुंडाराज फोफावले असून सैफ अली खानवरील हल्ला हे गुंडांनी महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्था दिलेले आव्हान आहे. महायुती सरकारच्या काळात गुंडाराज फोफावले असून हे सरकारचे अपयश आहे, अशी टीका काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. तर, वर्षा गायकवाड यांनीही या हल्ल्यानंतर राज्य सरकारच्या गृह विभागाला लक्ष्य केलं आहे. तसेच, सामान्यांच्या सुरक्षेचं काय असा सवालही उपस्थित केला आहे.

# जेवणाच्या ताटातील सुगंधी भात महागला

## ६९०० रूपयांवर पोहचला सुगंधित तांदळाचा भाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ अमरावती**

धानाची टंचाई असल्याचे कारण पुढे करून काही साठेबाजांनी तांदळाचा साठा केला आहे. डिसेंबरच्या अखेरीस नवीन सुगंधी तांदळाची आवक होण्यास सुरुवात होते. या तांदळाला महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात मागणी असते. धानाची टंचाई असल्याचे सांगत सुगंधी तांदूळ गेल्या एका महिन्यात १० ते १२ रुपये प्रतिकिलो महाग झालेला आहे. त्यात अजून वाढ होण्याची शक्यता आहे. यावर्षी



बासमती तांदळाच्या दरापेक्षा कालीमूंछ या तांदळाचे दर अधिक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. केंद्र सरकारने नॉन बासमती तांदळावरची निर्यात बंदी उठवली आणि निर्यात कर कमी केल्यामुळे सुगंधी तांदळालाविदेशातून मोठ्या प्रमाणात मागणी वाढलेली आहे.त्यामुळे नवीन हंगामाच्या सुरुवातीलाच सुगंधी तांदळाच्या दरात १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मागील वर्षी हंगामाच्या सुरुवातीला ५ हजार ५०० ते ६ हजार रुपये प्रतिक्विंटल दर होता. यंदा ठोक बाजारात हा दर ६ हजार ८०० ते ६ हजार ९०० रुपयांवर पोहोचला आहे. ही दरवाढ १० ते १५ टक्के आहे. तांदूळ हा अन्नपदार्थातला अविभाज्य घटक आहे. बिर्याणीपासून खीर, डोसा, इडली अशाप्रकारचे अनेक चविष्ट आणि पौष्टिक पदार्थ यापासून तयार होतात. मात्र आता याच तांदळाचे भाव वधारले आहेत.सुगंधी तांदळाचे सर्वाधिक उत्पादन मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश या राज्यात होते. विदर्भातील भंडारा, गोंदियासह इतरही जिल्ह्यांत या तांदळाचे उत्पादन होते.

### तांदळाचे असे आहेत दर

| प्रकार | किलो |
|---|---|
| बासमती | १२० |
| काली मुछ | ७५ |
| कोलम | ६५ |
| आरएनआर | ९९ |
| एचएमटी | ५० |
| बीपीटी | ४५ |

### मागील महिन्यात दरात १० टक्के वाढ

मागील आठवडाभरात काली मुछ या तांदळामध्ये तब्बल आठ रूपयांची वाढ झाली आहे. दिवसेंदिवस काली मुछ तांदळाची मागणी वाढत असल्याने सध्या बाजारपेठेत तांदळाच्या दरात वाढ होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना भूर्दंड बसत आहे.